RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118

दैनिक
# लोकरक्षणाय


प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, नवी मुंबई, पुणे, रायगड, नाशिक, सातारा, कोल्हापूर

वर्ष ०३ | अंक २२२ | पृष्ठे ०८ | रू. २/-

लोकरक्षणाय – लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | ठाणे, दिनांक शनिवार, ०६ डिसेंबर २०२५

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118 | 022 - 6971 1890



वाहतूक पोलिसांची थेट सिग्नल वर जनजागृती पान ३ वर

विशेष लेख

डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक न्याय... पान ४ वर

**सुविचार**

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे,
जो पेईल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही."

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ऊर्जा क्षेत्रात 'एआय' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पर्यावरणपूरक शाश्वत... पान ८ वर



विशेष उपक्रम

वाचकांसाठी खास उपक्रम - ध्यास+ (ध्यास सकारात्मकतेचा) पान ५ वर

ध्यास सकारात्मकतेचा

# संघर्षातून पुढे आलेल्या युवकांनी समाजाचे 'रोल मॉडेल' व्हावे

## अनाथ मुलांना आरक्षण देण्याचा निर्णय मनाला गहिवर आणणारा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● मुंबई, दिगंबर जाधव :

अनाथ मुलांना आरक्षण देण्याचा निर्णय हा माझ्या जीवनातील सर्वात समाधान देणारा निर्णय आहे. संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या 'संधीची समानता' या तत्त्वाच्या प्रेरणेने राज्य शासनाने १ टक्का अनाथ आरक्षणाचा निर्णय घेतला आहे, या निर्णयामुळे ८६२ अनाथ युवक-युवती स्वावलंबी होऊन समाजासाठी कार्यरत असल्याचा अभिमान वाटतो, शासनाच्या वर्षपूर्तीची सुरुवात सुंदर कार्यक्रमाने झाली असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाचा लाभ घेऊन शासकीय सेवेत रुजू झालेल्या अनाथ मुलांशी संवाद साधला.



कार्यक्रमास विधानपरिषद आमदार श्रीकांत भारतीय व लाभार्थी अनाथ युवक युवती उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आज मलाही मुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन वर्ष झाले. या वर्षपूर्तीची सुरुवातप्रसंगी अतिशय सुंदर कार्यक्रमाने झाली. निःशब्द भाव खूप बोलणारा असतो, तसा भाव आज माझ्या मनात आहे. शासनात अनेक निर्णय घेतले जातात, अनेक कामे केली जातात, पण काही निर्णय मनाला गहिवर देतात. तसाच अनाथ मुलांना आरक्षण देण्याचा निर्णय आहे.

संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'संधीची समानता' हे तत्व आपल्या संविधानात समाविष्ट केले. पण ही समानता केवळ सामाजिक आरक्षणातून मर्यादित राहता कामा नये. अनाथ, दिव्यांग आणि इतर वंचित घटकांनाही संधी मिळायला हवी. त्या विचारातूनच १ टक्के अनाथ आरक्षणाचा निर्णय झाला. या निर्णयामुळे अनेकांच्या आयुष्यात खरा बदल घडला आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**संघर्षातून पुढे आलेल्या युवकांनी समाजाचे 'रोल मॉडेल' व्हावे**

आपण जे काही साध्य करतो, ते समाजाने निर्माण केलेल्या व्यवस्थेमुळे शक्य होते. शाळा, संस्था, शासनव्यवस्था, उद्योग हे सर्व समाजाच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे.

पान २ वर

### () थोडक्यात ()

**अत्याचारग्रस्तांच्या वारसांनी नोकरीसाठी १० डिसेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन**

मुंबई : सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या २० नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ (सुधारीत अधिनियम, २०१५) अंतर्गत दाखल खून किंवा अत्याचारामुळे झालेल्या मृत्यूच्या प्रकरणांमध्ये दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्र वारसास शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नोकरी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या अनुषंगाने मुंबई उपनगर जिल्ह्यातील अशा प्रकरणांतील पात्र वारसांनी १० डिसेंबर २०२५ पर्यंत अर्ज करावे,असे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहायक आयुक्त समाज कल्याण यांनी केले आहे.

**नोंदणी व मुद्रांक विभागात नवीन ९६५ पदनिर्मितीसह ३,९५२ पदे मंजूर – नोंदणी महानिरीक्षक**

पुणे : नोंदणी व मुद्रांक विभागाच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी देणारा शासन निर्णय महसूल व वन विभागाने जारी केला आहे. यामुळे विभागात नवीन ९६५ पदांच्या निर्मितीने मंजूर पदांची संख्या वाढून ३,९५२ झाली असल्याची माहिती नोंदणी महानिरीक्षक रविंद्र बिनवडे यांनी दिली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशांची अंमलबजावणी करत मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागामध्ये ९६५ नवीन पदांची निर्मिती करून एकूण ३,९५२ पदांचा नवा आकृतीबंध ४ डिसेंबर २०२५ रोजी महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आला आहे.

## ...तर 'रॅपिडो', 'उबेर' सारख्या कंपन्यांवर थेट गुन्हे दाखल करा; परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आदेश

● मुंबई, विशाल कारंडे :

सरकारी नियमावलीला फाटा देऊन बेकायदेशीर प्रवासी वाहतूक करून प्रवाशांचा जीव धोक्यात घालणाऱ्या रॅपिडो, उबेर यासारख्या ॲप आधारित बाइक टॅक्सी कंपन्यांविरोधात गुन्हे दाखल करा, असे स्पष्ट




निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोटार परिवहन विभागाला दिले आहेत.सरकारने ई-बाइक धोरण नुकतेच जाहीर केले आहे. त्यानुसार अनेक ॲप आधारित बाइक टॅक्सी कंपन्यांनी व्यवसाय सुरू केला आहे. तथापि, चालकांना नियमावली व प्रवासी सुरक्षिततेसंबंधी कोणतेही प्रशिक्षण न देता त्यांची नियुक्ती करून त्या खासगी अथवा साध्या बाइकद्वारे प्रवासी सेवा दिली जात आहे. हे अत्यंत धोकादायक आहे. नुकतीच एका प्रवाशाचा अशा अवैध बाइक टॅक्सीवरून जाताना मृत्यू झाला आहे. ही घटना ताजी असताना उपरोक्त ॲप आधारित बाइक टॅक्सी कंपन्या शासनाच्या नियमावलीची पायमल्ली करून बेकायदेशीर व्यवसाय करत आहेत.

पान २ वर

## सीमेपलीकडून छेडछाड!; भारतीय शाळकरी मुलींची बांगलादेशी नागरिकाने काढली छेड; सोशल मीडियावर संताप

● नवी दिल्ली, वार्ताहर :

भारत आणि बांगलादेशमधील तणाव वाढलेला असताना पश्चिम बंगालमधील भारत–बांगलादेश सीमेजवळ हकीमपूर परिसरात शाळेत जाण्यासाठी निघालेल्या भारतीय विद्यार्थिनींची एक बांगलादेशी नागरिक खुलेआम



छेड काढत असल्याचा धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे. 'एशियानेटन्यूज'च्या वृत्तानुसार हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियासह स्थानिकांमध्येही संताप उसळला असून सीमावर्ती भागातील सुरक्षा, गस्त आणि देखरेख याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या प्रकारामुळे सुरक्षित मानल्या जाणाऱ्या संवेदनशील सीमावर्ती पट्ट्यात अशी घटना कशी घडली, याबाबत संताप व्यक्त होत आहे. घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात फिरत असला तरी अद्याप बीएसएफ किंवा कोणत्याही सरकारी यंत्रणेकडून याबाबत अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. त्यामुळे व्हिडिओ खरा आहे की नाही हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

पान २ वर

## पुण्याच्या मुंढवा येथील जमीन घोटाळा प्रकरण: शीतल तेजवानीला पोलीस कोठडी

● पुणे, शकील शेख :

पुण्यातील मुंढवा भागातील जमीन गैरव्यवहार प्रकरणातील मुख्य आरोपी शीतल तेजवानी गुरुवारी न्यायालयात हजर करण्यात आली. न्यायालयात युक्तिवाद सुरू असताना तिला चक्कर आली, तर न्यायालयाने तिला समोरील खुर्चीवर बसण्याची परवानगी दिली. या प्रकरणात न्यायालयाने शीतल तेजवानीला ११ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय जमीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीला विकल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी तिला बुधवारी अटक केली होती. मुंढवा येथील कोट्यवधी रुपयांच्या जमीन गैरव्यवहार प्रकरणात शीतल तेजवानी मुख्य सूत्रधार म्हणून समोर आल्यामुळे



आर्थिक गुन्हे शाखेने तिला अटक केली आहे.

न्यायालयात तेजवानीच्या जामीन अर्जाला सरकारी पक्षाच्या वकिलांकडून तीव्र विरोध करण्यात आला. त्याचबरोबर, या जमिनीचे मूळ वतनदार असलेल्या महार वतनदारांच्या वतीने देखील तेजवानीच्या जामीनाला विरोध करण्यात आला.

तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयाला सांगितले की, शीतल तेजवानीने २००६ ते २००८ या कालावधीत कोणतेही अधिकार नसताना मुंढवा भागातील ४० एकर जागेचे कुलमुखत्यारपत्र महार वतनदारांकडून घेतले. विशेष म्हणजे, सदर जमीन शासनाच्या मालकीची असताना तेजवानीने ती महार वतनदारांची असल्याचा दावा केला आणि त्यासाठी खोटी कागदपत्रे जोडली होती.

हा जमीन घोटाळा मोठ्या प्रमाणाचा असून, या जमिनीची किंमत बाराशे ते पंधराशे कोटी रुपये आहे. मात्र, तेजवानीने फक्त अकरा हजार रुपये भरून सदर जमीन बळकावण्याचा प्रयत्न केला. जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल केलेला अकरा हजार रुपयांचा चेक देखील वटलेला नव्हता. तपास अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, तेजवानीने अकरा हजार रुपये का दिले, याची चौकशी करणे आवश्यक आहे. २०१३ मध्ये महसूलमंत्र्यांनी तिचा दावा फेटाळला होता, त्यानंतर उच्च न्यायालयात धाव घेतली होती, पण न्यायालयानेही तो दावा फेटाळून लावला.

पान २ वर

## बेमुदत शाळा बंद आंदोलनाची वेळ आणू नका; शिक्षक संघटनांचा इशारा

● पुणे, सुचिता देशमुख :

शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने ठोस निर्णय घेतला नाही, तर आगामी काळात "बेमुदत शाळा बंद" आंदोलन सुरू केले जाणार आहे, असा इशारा मुंबई मुख्याध्यापक संघटनेने आज दिलाय. मुंबई शिक्षण निरीक्षक कार्यालयासमोर मोठ्या संख्येने एकत्र जमलेल्या मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या घोषणाबाजीने परिसर दणाणून गेलाय. १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयात बदल न केल्यास तसेच टीईटीसंदर्भात




शासनाने तातडीचा निर्णय न घेतल्यास कठोर पावले उचलावी लागतील, असा इशारा संघटनेने दिला आहे. संघटनेच्या नेतृत्वात बृहन्मुंबई माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष संजय पाटील, मुंबई मुख्याध्यापक संघटना उत्तर विभागाचे अध्यक्ष अनिल बोरनारे, उपाध्यक्ष जयसिंग कदम, कोषाध्यक्ष मीनल सरकाळे, गणेश कांबळे, पश्चिम विभागाचे अध्यक्ष रियाज खान आणि सहसचिव आशिष वशी यांसह मुंबईतील अनेक शिक्षक, मुख्याध्यापक उपस्थित होते.

**शिक्षकांच्या मागण्या :**

१. सर्व शिक्षकांसाठी सरसकट TET उत्तीर्ण होण्याची अट रद्द करणे

२. १५ मार्च २०२४ चा अन्यायकारक शासन निर्णय तत्काळ रद्द करणे

३. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे

४. शिक्षकांना १०-२०-३० वर्षांच्या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणे

५. शिक्षणसेवक पद रद्द करून सुरुवातीपासून कायमस्वरूपी नेमणूक करणे

पान २ वर

## अर्थ घडामोडीला वेग!

### रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारतात येताच आर्थिक व्यवहार सुरू

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या गुरुवारपासूनच्या भारतभेटीने अर्थजगतातील घडामोडींनी वेग घेतला आहे. रशियाची सर्वात मोठी बँक एसबरबँक (Sberbank) आणि जेएससी फर्स्ट ही निधी मालमत्ता व्यवस्थापन कंपनीने एक नवीन म्युच्युअल फंड-फर्स्ट इंडिया गुरुवारी सादर केला. त्याचबरोबर वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि त्यांचे कॅनेडियन समकक्ष मनिंदर सिद्धू यांनी बुधवारी प्रस्तावित मुक्त व्यापार करारावर वाटाघाटी



सुरू करण्यासाठी आराखडे, उद्दिष्टे आणि पद्धतींवर चर्चा केली. तिकडे औषध उत्पादक ल्युपिनने गुरुवारी सांगितले की त्यांनी कर्करोगाच्या रुग्णांमध्ये न्यूट्रोपेनियाच्या उपचारांसाठी सूचित केलेल्या बायोसिमिलर, आर्मलूपेगचे व्यावसायिकीकरण करण्यासाठी अमेरिकेतील व्हॅलोरम बायोलॉजिक्ससोबत परवाना करार केला आहे.

**रशियन बँकेचा भारतात नवा फंड**

रशियाची सर्वात मोठी बँक एसबरबँक (Sberbank) आणि जेएससी फर्स्ट ही निधी मालमत्ता व्यवस्थापन कंपनीने एक नवीन म्युच्युअल फंड - फर्स्ट इंडिया गुरुवारी सादर केला. तो निफ्टी५० निर्देशांकाच्या कामगिरीशी जोडलेली गुंतवणूक पर्याय देऊ करतो. यामुळे रशियन किरकोळ गुंतवणूकदारांना भारताच्या शेअर बाजाराशी थेट संपर्क साधता येईल.रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या गुरुवारपासून सुरू होणाऱ्या नवी दिल्लीच्या जवळपास २७ तासांच्या दौऱ्यादरम्यान ही घोषणा करण्यात आली आहे.

पान २ वर

## संपादकीय

### निवडणुकीतील लोकशाहीही संशयास्पद

भारतात लोकशाही केवळ निवडणुकांमधेच शिल्लक असल्याचा दावा आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या विविध लोकशाहीवादी संघटना करत असतानाच निवडणुकीतील लोकशाहीही संशयास्पद करण्याचा चंग आपल्याकडील राजकीय पक्षांनी बांधलेला दिसतो. बिहारमधल्या निवडणुकांमध्ये पूर्वी जे गैरप्रकार आणि गैरव्यवहार होत असत त्यापेक्षाही अधिक उच्च दर्जाचे गैरमार्ग महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वापरले गेल्याचं गेल्या दोन-तीन दिवसांतील बातम्यांवरून दिसतं. बिहारमधल्या गैरप्रकारांसाठी त्या राज्यातील काही भाग किंवा जिल्हे बदनाम होते. महाराष्ट्रात याबाबतीत गैरप्रकारांचा कोणताही असमतोल नाही. कुठल्याच भागाने आपला अनुशेष राहू दिलेला नाही. संपूर्ण महाराष्ट्रातल्या निमशहरी भागातल्या या निवडणुकांनी विचारी माणसांना आणि काही नेत्यांनाही चकीत केलं आहे. प्रदेश सुपीक असो वा दुष्काळी; पैशांचा महापूर सर्वत्र सारखाच होता, असं ऐकायला मिळतं. यापूर्वीच्या निवडणुकांत पैशांचा वापर होतच नव्हता, असं नाही. महाराष्ट्र या वाममार्गाला एका रात्रीतून लागला, असंही नाही. पण, ज्यांनी गेली ४०-५० वर्ष सक्रीय राजकारणात घालवली, स्वतःसह अनेक निवडणुका लढवल्या आणि जिंकल्या; अशी नेतेमंडळीही असा पैसा आम्ही कधी पाहिला नाही असं मनापासून म्हणतात, तेव्हा हे सारे कोठून येते? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. निवडणुकीतला पैशाचा प्रच्छन्न वापर हा एक भाग. त्याशिवाय उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरताच येऊ नये यासाठीची अडवाअडवी, निवडणूक प्रचारातील हिंसक भाषा, गल्लीबोळात कार्यकर्त्यांत झालेली धुमश्चक्री ही सगळी लोकशाहीच्या हासाची चिन्हं आहेत. प्रेमात आणि युद्धात सगळं माफ असतं या जगप्रसिद्ध वचनाचा आधार घेऊन निवडणुकीने घेतलेल्या या वळणाकडे कोणी गांभीर्याने पाहणार नसेल, तर पुढची संकटं यापेक्षा मोठी असतील, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. शेजारी पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळमध्येही लोकशाही आहेच. भारताचं नांव लवकरच त्या पंक्तीत बसवायचं का, याचा विचार पक्ष आणि नेत्यांनी नाही; इथल्या मतदाराने, सामान्य माणसाने करायचा आहे. या निवडणुका नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या होत्या. म्हणजे अर्धनागरिकरण झालेल्या परिसरातल्या होत्या. शहर आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या सीमा रेषेवरील भागातल्या. यात लोकसंख्येनुसार वर्गवारी आहे.श्रीमंत-गरीब असा भेदभावही आहे. पण, तो त्या संस्थेच्या आर्थिक उत्पन्नावरून. पर्यायाने त्या संस्थेच्या अर्थसंकल्पावरून. पण, गरीब म्हणजे ब किंवा क वर्ग संस्था आहे, म्हणून तिथे राजकीय दंडेलशाही नाही, असं नाही. तिथल्या सत्ताप्राप्तीसाठीही तेवढीच ईर्षा, तेवढीच तीव्र महत्वाकांक्षा आणि येनकेन प्रकारेण सत्ताप्राप्तीसाठी नको त्या मार्गाचा अवलंब करण्याची तीच तयारी ! स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका किंवा त्यातली चढाओढ महाराष्ट्राला नवी नाही. निवडणूक हीच एक नशा असते; त्यामुळे प्रत्येक निवडणूक रंगतदार असते, संबंधितांनी सर्वस्व पणाला लावून ती लढवायची असते, हे मान्यच. पण, तरीही यावेळची निवडणूक या सगळ्या पलीकडची होती. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात झपाट्याने नागरिकरण झालं, जी संपन्नता आली, त्याचा हा परिणाम मानायचा का? उत्तर एकच नसेल. वेगवेगळी कारणं असू शकतील. पण, त्या कारणांचा विचारी आणि धोरणी माणसांनी शांतपणे विचार करणं गरजेचं आहे. नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांत हे चित्र असेल, तर महानगरपालिकांच्या निवडणुकीत काय होईल ? त्यानंतरच्या जिल्हा परिषद निवडणुका म्हणजे तर मिनी विधानसभा! त्यात हे चित्र आणखी किती पटीने विस्तारलेलं असेल? असे अनेक प्रश्न आज महाराष्ट्रात गावागावांत चर्चिले जात आहेत. राजकीय पक्षांच्या नेत्यांना ते सगळयात आधी ऐकू आले असतील. त्यांच्या याबाबतच्या नेमक्या प्रतिक्रिया आणि विश्लेषण येत्या आठवड्याभरात ऐकायला येईलच. नगर परिषदा आणि पंचायतींच्या निवडणुकीत राष्ट्रीय, राज्य पातळीवरील प्रश्न येत नाहीत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका सभेत केलेल्या वर्णनाप्रमाणे या निवडणुका गटर-मीटर अन् वॉटरच्या निवडणुका असतात.

- अनिकेत घनश्याम भंकाळ

## आजची चित्रोळी



आकाशी सूर्य-चंद्र खुलतो
झाडावरती फुलें !
चेहऱ्यावरती हास्य ठेवा
लोक होतील खुळे !!

मुकुंद कुलकर्णी

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता !

विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाण दीन. महापरिनिर्वाणदिनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने



भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ बाबासाहेब आंबेडकर व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे.

डॉ बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. 'मूकनायक' पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले.

इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी "आम्ही शासनकर्ती जमात बनणार" या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती.गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, "या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते."

पत्रकार महामानव डॉ बाबसाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन!!

- श्याम ठाणेदार

## पान १ वरून...

### संघर्षातून पुढे आलेल्या युवकांनी...

त्यामुळे या समाजाला परत काहीतरी देणे, हा प्रत्येकाचा धर्म आहे. संघर्षातून पुढे आलेले हे युवक समाजात 'रोल मॉडेल' बनावेत, अशी अपेक्षाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली. जिथे पोहोचलात तिथे थांबू नका. संघर्षातून मिळवलेले यश हे पुढे समाजासाठी अविरत कार्य करण्याची प्रेरणा ठरावी. स्थैर्य मिळाल्यानंतरही समाजासाठी काहीतरी देण्याची भावना मनात कायम ठेवावी,असेही त्यांनी यावेळी सांगितले.

माणसाचे कार्यच त्याला अमरत्व देतं. कार्यातूनच माणूस जिवंत राहतो. म्हणून तुमचं कार्यच तुमची ओळख बनवा, असे सांगून कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व अनाथ युवकांचा गौरव केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात विनायक विश्वकर्मा या युवकाने मुख्यमंत्री यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करत एक भावस्पर्शी कविता सादर केली.

आज घ्यायला नाही सर, काही द्यायला आलोय,तुम्ही आरक्षण दिलं, दारिद्र्यातून बाहेर आलोय

तुम्ही मुख्यमंत्री महाराष्ट्राचे, पण आम्ही तुम्हाला 'देवा भाऊच' म्हणणार

या ओळींनी भावनिक वातावरण निर्माण झाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्या युवकाचे कौतुक करतांना सांगितले की, या कवितेतून उमटणारी कृतज्ञता हीच या निर्णयाची खरी पावती आहे. समाजासाठी देण्याची भावना जर प्रत्येकामध्ये निर्माण झाली, तर तेच खरे परिवर्तन आहे.या संवादात उपस्थित युवकांनीही आपल्या अनुभवांची मांडणी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शासनाचे आभार व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, या आरक्षणामुळे त्यांना शिक्षण, रोजगार आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे. आज आम्ही इतर अनाथ मुलांसाठी प्रेरणा आहोत.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस निरीक्षक अभय तेली व आभार प्रदर्शन जाणीव वृद्ध आश्रमाचे संचालक मनोज पांचाळ यांनी केले.

### ...तर 'रॅपिडो', 'उबेर' सारख्या...

अशा अनेक तक्रारी मंत्री सरनाईक यांच्याकडे येत होत्या.

या तक्रारीची दखल घेत अशा बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे निर्देश सरनाईक यांनी दिले. देशातील इतर राज्यांत ज्या पद्धतीने या कंपन्या शासकीय नियमांना हरताळ फासून बेकायदेशीर व्यवसाय करतात, तसे महाराष्ट्रात चालणार नाही, प्रवाशांची सुरक्षितता केंद्रस्थानी ठेवून सर्वसामान्य चालकांचे शोषण न करता नियम व सुरक्षिततेचे निकष पाळून आपला व्यवसाय करणाऱ्या ॲप आधारित बाइक टॅक्सी कंपन्यांना शासनाचा पाठिंबा राहील, परंतु चालकांचा गैरफायदा घेऊन बेकायदेशीररीत्या शासकीय नियमांची पायमल्ली करून प्रवाशांचा जीव धोक्यात आणणाऱ्या ॲप आधारित बाइक टॅक्सी कंपन्यांवर यापुढेही अशीच धडक मोहीम राबवली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

**...तर मालकांवरही गुन्हे दाखल होणार**

जितक्या बाइक अशाप्रकारे बेकायदेशीर वाहतूक करताना आढळतील तितके गुन्हे संबंधित चालकावर न दाखल करता ती बाइक ज्या ॲप आधारित कंपनीची आहे, त्या मालकावर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा सज्जड दम परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

**रॅपिडोविरोधात गुन्हा दाखल**

त्यांच्या निर्देशानुसार २ डिसेंबर रोजी 'रॅपिडो या ॲप आधारित कंपनीविरोधात मोटार परिवहन विभागाने मुंबईतील घाटकोपर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. 'रॅपिडो' कंपनीच्या वतीने मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ६६ (१) आणि १९२ अन्वये बेकायदेशीररीत्या 'बाइक टॅक्सी' चालवल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

**नफ्यासाठी खासगी वाहनांचा वापर**

मुंबई आरटीओच्या मोटार वाहन निरीक्षकांनी केलेल्या तपासणीत 'रॅपीडो' म्हणजे रोपन ट्रान्सपोर्ट कंपनी 'राइड शेअरिंगच्या नावाखाली प्रवाशांची वाहतूक करत असल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे कंपनीने प्रवासासाठी वापरलेली वाहने ही खासगी मालकीची होती. मोटार वाहन कायद्यानुसार, खासगी वाहने प्रवासी वाहतुकीसाठी वापरण्यास सक्त मनाई आहे. असे असतानाही, कंपनीने नफा मिळवण्याच्या उद्देशाने या नियमांचे उल्लंघन केले.

### सीमेपलीकडून छेडछाड!; भारतीय...

सध्या मतदार यादीच्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (SIR) प्रक्रियेमुळे अनेक बांगलादेशी नागरिक अटकेच्या भीतीने हकीमपूर चेकपोस्टमार्गे स्वेच्छेने बाहेर पडत आहेत, असे स्थानिक सूत्रांचे म्हणणे आहे.

**सोशल मीडियावर संतापाची लाट**

हा प्रकार समोर आल्यानंतर सोशल मीडियावर नागरिकांनी तीव्र प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत. सीमावर्ती भागातील सुरक्षाव्यवस्थेला बळकटी देण्याची मागणी जोर धरत आहे. व्हिडिओखाली कमेंटमध्ये लोक व्यक्त होत आहेत.

**भारत-बांगलादेश तणावाच्या पार्श्वभूमीवर घटना गंभीर**

सध्या दोन्ही देशांमध्ये अवैध स्थलांतर, राजकीय अस्थिरता, व्यापारातील वाद, तसेच बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना भारतात असल्याने निर्माण झालेली राजकीय संवेदनशीलता अशा अनेक कारणांमुळे तणाव वाढलेला आहे. व्यापारातील प्रत्युत्तरात्मक कारवाईमुळे लॉजिस्टिक्स क्षेत्रावरही मोठा परिणाम झाला आहे. दरम्यान, सीमेवरील गस्त वाढवावी, निगराणी कडक करावी आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

### पुण्याच्या मुंढवा येथील जमीन...

शीतल तेजवानीच्या वकिलांनी पुढे सांगितले की, येवले यांना पोलीसांनी चौकशी केलेली नाही, त्याला अटकपूर्व जामीन मिळाला आहे, पण आमच्यावर कारवाई केली जात आहे. दुसरीकडे, तेजवानीच्या वकिलांनी सदर वादग्रस्त जागा मूळ महार वतनदारांची असल्याचा दावा केला. महार वतनदारांच्या वकिलांचा मात्र दावा आहे की, तेजवानीने त्यांचीही फसवणूक केली आहे.

**पैशांचा व्यवहार न झाल्याचा दावा**

शीतल तेजवानीच्या वकिलांनी तिच्यावरील आरोप फेटाळण्याचा प्रयत्न केला. वकिलांनी युक्तिवाद करताना सांगितले की, तेजवानीला मराठी समजत नाही, तरीही तिला मराठीतून नोटीस बजावण्यात आली. सरकारी वकिलांनी प्रतिवाद केला की, तिने कुलमुखत्यारपत्र मराठीतच घेतले होते. वकिलांनी दावा केला की, तेजवानीला ३०० कोटी रुपये मिळालेच नाहीत आणि पैशांचा व्यवहार झालाच नाही. तसेच, त्यांनी या प्रकरणासाठी तहसीलदार येवले यांच्यावर खापर फोडण्याचा प्रयत्न केला.

**आणखी आरोपी सहभागी असण्याची शक्यता**

तेजवानीने ही जमीन अमेडीया कंपनीच्या दिग्विजय पाटील यांना ३०० कोटी रुपयांना विकण्याचा प्रयत्न केला. या तीनशे कोटी रुपये कोणत्या खात्यावर गेले, याचा तपास आवश्यक आहे. हा गुन्हेगारी स्वरूपाचा कट असून, प्रकरणाची व्याप्ती मोठी आहे आणि आणखी आरोपी सहभागी असण्याची शक्यता आहे. यासाठी शीतल तेजवानीला १४ दिवसांची पोलीस कोठडी देण्याची मागणी तपास अधिकाऱ्यांनी केली.

### बेमुदत शाळा बंद आंदोलनाची...

**बेमुदत शाळा बंद आंदोलनाची वेळ आणू नका :** या आंदोलनात भाषण करताना अनिल बोरनारे यांनी सांगितले की, १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयामुळे शाळांमधील शिक्षक अतिरिक्त घोषित होतील आणि शेकडो शाळा 'शून्य शिक्षकी' बनतील. विद्यार्थ्यांना शिकविणार कोण? हजारो विद्यार्थी शिक्षकाविना राहतील. परिणामी विद्यार्थ्यांची गळती मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवण्यासाठी जुन्या संचमान्यतेनुसार शिक्षकसंख्या देणे आवश्यक आहे," असे बोरनारे म्हणाले. जर शासनाने योग्य तातडीचे पावले उचलली नाहीत तर विद्यार्थ्यांच्या हितासाठी आम्ही बेमुदत शाळा बंद करण्यास मागे-पुढे पाहणार नाही, असे बोरनारे यांनी सांगितले. या आंदोलनामुळे शिक्षण विभागावर तातडीने निर्णय घेण्याचा दबाव निर्माण झाला असून, पुढील काही दिवसांत शिक्षक आणि शासन यांच्यातील चर्चेची दिशा राज्यभरातील शाळांच्या कामकाजावर मोठा परिणाम करू शकते.

**शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचं शुक्रवारी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन :** विशेष म्हणजे टीईटी परीक्षा अनिवार्य करण्याच्या निर्णयाविरोधात कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनात सहभाग घेतला. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील २,८८२ शाळा पूर्णपणे बंद राहिल्या. ज्यामध्ये जिल्हा परिषदेच्या १,९७० प्राथमिक, ८५६ माध्यमिक आणि कोल्हापूर महापालिकेच्या ५६ शाळांचा समावेश आहे. सकाळी ११ वाजता दसरा चौकातून निघालेला हजारो शिक्षकांचा मोर्चा व्हीनस कॉर्नर, बसंत-बहार टॉकीज रोड मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या ठिकाणी रस्त्यावरच काही काळ सर्वांनी ठिय्या धरला. तर निवेदन देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात शिक्षकांचे शिष्टमंडळ जातेवेळी पोलीस आणि आंदोलनकर्त्यांमध्ये वाद आणि धक्काबुक्कीचा प्रकार पाहायला मिळाला.

### अर्थ घडामोडीला वेग...

एसबरबँकचे सीईओ आणि कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष हरमन ग्रेफ यांनी त्यांच्या भारताच्या व्यावसायिक भेटीदरम्यान नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया येथे झालेल्या एका कार्यक्रमात या फंडाच्या लाँचची घोषणा करण्यात आली, असे शेअर बाजाराने गुरुवारच्या एका निवेदनात स्पष्ट केले आहे.

रशियाच्या राष्ट्राध्यक्षांची ही २३ वी भारत-रशिया वार्षिक शिखर परिषद आहे. ही भेट महत्त्वपूर्णमानली जात आहे.

**यंदाच्या भेटीतील प्रमुख मुद्दे**

- मोठे संरक्षण करार
- एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीच्या सुरू असलेल्या पुरवठ्याचा आढावा
- नवे सु-५७ फायटर जेट्स खरेदी करण्याबाबत भारताची उत्सुकता

२०२४-२५ मध्ये भारताची रशियाला निर्यात ४.९ अब्ज डॉलर होती, तर मागील आर्थिक वर्षात आयात ६३.८ अब्ज डॉलर होती. त्यामुळे ५९ अब्ज डॉलरचे व्यापार तूट निर्माण झाली. दोन्ही देशांनी २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर द्विपक्षीय व्यापाराचे लक्ष्य निश्चित केले आहे.

रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची गेल्या चार वर्षांतली ही दुसरी भारत भेट आहे. कोविड-१९ महासाथ सुरू असल्याने २०२१ मध्ये त्यांनी केलेली भारत भेट केवळ पाच तासांच्या कालावधीत पार पडली होती.या भेटीत पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण, ऊर्जा आणि दीर्घकालीन भागीदारीविषयी चर्चा केली होती. त्यांच्या या भेटीनंतर तीन महिन्यांनी रशियाने युक्रेनवर मोठ्या प्रमाणात आक्रमण केले.

**'त्या' भेटीत नेमके काय घडले होते..?**

पुतिन यांनी ६ डिसेंबर २०२१ रोजी २१ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेकरिता भारताचा दौरा केला होता. त्यांनी पंतप्रधान मोदी आणि उच्चस्तरीय प्रतिनिधीमंडळासोबत बैठक घेतली. दोन्ही नेत्यांनी "विशेष आणि विशेषाधिकारयुक्त सामरिक भागीदारी" कोविड काळातही सक्षम राहिल्याचे अधोरेखित केले.

**दोन्ही देशांनी घेतलेला आढावा :**

- संरक्षण आणि सामरिक सहकार्याची सखोल समीक्षा
- २+२ संवाद यंत्रणेची सुरुवात स्वागतार्ह असल्याचे मत
- सैन्य-तांत्रिक सहकार्य विस्तारावर भर

**इतर प्रमुख चर्चा विषय :**

- द्विपक्षीय गुंतवणूक वाढविणे
- आयएनएसटीसी मार्ग आणि प्रस्तावित चेन्नई–व्लादिवोस्तोक सागरी मार्गाद्वारे संपर्क वाढविणे
- दीर्घकालीन विकासाच्या नव्या संधी निर्माण करणे
- अफगाणिस्तानची परिस्थिती, महामारीनंतरचा आर्थिक पुनरुज्जीवन मार्ग

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेसह बहुपक्षीय मंचांवर दोन्ही देशांच्या भूमिकांतील सामायिकता

**दोन अब्ज डॉलरची पाणबुडी करार :**

व्यापार, ऊर्जा, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, शिक्षण आणि अवकाश या क्षेत्रांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. दौऱ्याच्या अखेरीस पुतिन यांनी मोदींना २०२२ मधील पुढील शिखर परिषदेकरिता रशियाला भेट देण्यासाठी आमंत्रित केले.

**नवे भू-राजकीय वास्तव**

पुतिन यांची २०२१ मधील भारत भेट अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्हाइट हाऊसमध्ये पुनरागमनापूर्वीची होती. मागील तीन वर्षांत पाश्चात्य देशांनी मोठ्या प्रमाणावर भारताकडून स्वस्त रशियन तेल खरेदीकडे दुर्लक्ष केले होते.परंतु आता ट्रम्प यांच्या भारतविषयक टीकात्मक वक्तव्यांमुळे आणि अमेरिकेने लावलेल्या उच्च आयात शुल्कामुळे दोन्ही देशांतील संबंधांमध्ये तणाव वाढल्याची चिन्हे सध्या दिसतात.

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. १२, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,15 No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor-Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

# वाहतूक पोलिसांची थेट सिग्नल वर जनजागृती

## हातात फलक घेऊन उभे असणाऱ्या वाहतूक पोलिसांची "गांधीगिरी" पाहून सुखद धक्का

**नवी मुंबई (भावना जैन) :** कितीही दंडात्मक कारवाई केली तरीही वाहतूक नियमांचे उल्लंघन कमी अधिक प्रमाणात होतंच असते. त्या साठी वाहतूक विभाग जनजागृतीचे कार्यक्रमही आयोजित करतात. मात्र कार्यक्रम संपला कि काही वेळात विषय संपतो अशी अवस्था असल्याने आता तर थेट वाहतूक पोलीस सिग्नल वर हातात फलक घेत रांगेत उभे राहिले आहेत. या फलकांवर वाहतूक नियम पाळण्याविषय जनजागृती केली गेली आहे. नवी मुंबईतील एपीएमसी वाहतूक पोलिसांनी हा उपक्रम राबविल्याने शहर भर त्याची चर्चा होत आहे.



१०० % शिक्षित असणाऱ्या नवी मुंबईतही वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे सहज आढळून येतात. त्यात नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात पहाटे पासून कृषी निगडित माल घेऊन शेकडो ट्रक सारखी जड अवजड वाहने धडकतात . त्यात अनेकदा माल उतरविण्यास जागा नसेल तर बाजार समिती बाहेर रस्त्याच्या कडेला वाट पाहत थांबतात. त्यात सकाळी सात आठ नंतर सामान्य वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरु होते. त्यामुळे पहाटे पासून रात्री पर्यंत या भागात जड अवजड वाहने हलकी वाहने रिक्षा टेम्पो, प्रवासी बस आणि मोठ्या प्रमाणात दुचाकी वाहनांची रेलचेल असते.

त्यात रिक्षा आणि दुचाकी वाहने सिग्नल तोंडाने बेशिस्त पार्किंग अचानक ब्रेक मारून गाडी थांबवणे असे प्रकार होत असल्याने छोटे मोठे अपघात होत असतात. त्यांना वाहतूक पोलीस वेळोवेळी तसेच विशेष कारवाई अंर्तगत कारवाई करत असतात. मात्र आता वाहतूक पोलिसांनी गांधीगिरी करीत सिग्नल लाल दिवा लागला कि थांबलेल्या वाहन चालकांना वाहतूक नियमांचे महत्व पटवून देत आहेत. विशेष म्हणजे रस्त्यावर एका रांगेत आणि हातात फलक धरून उभे राहत आहे. या फलकांवर वाहतुकीचे नियम आणि त्याचे महत्व असणारे वाक्य ठळक अक्षरात लिहलेली आहेत.

या बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी भांडवलकर यांनी माहिती देताना सांगितले कि वाहतूक नियम अनेकांना माहिती असतात तर अनेकांना माहिती नसतात दोन्ही बाबतीत उजळणी होत असते त्यामुळे उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही जनजागृती मोहीम सुरु केली आहे. यात वाहतूक नियमांच्या बाबत माहिती आणि महत्व विशद करणारे फलक घेत वाहतूक पोलीस केवळ उभे राहत नाहीत तर त्याबाबत थांबलेल्या वाहन चालकांशी संवाद साधत नियमांचे गांभीर्य पटवून देतात. केवळ दंड आकारणीच नव्हे तर जनजागृती हि आवश्यक आहे. त्यामुळे असे उपक्रम राबवले जातात.

## कल्याणच्या ६४ वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकाला जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदके

**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याणमधील ६४ वर्षाचे ज्येष्ठ नागरिक अशोक दीक्षित यांना श्रीलंका येथे झालेल्या जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत वजनी गटात दाखविलेल्या यशस्वी कामगिरीबद्दल दोन सुवर्ण पदके मिळाली. जागतिक पॉवरलिफ्टिंग संघटनेच्या मार्गदर्शनाखाली श्रीलंका येथे ही पॉवरलिफ्टिंग स्पर्धा तीन दिवस २८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. ज्येष्ठ नागरिक असुनही वजनी गटात अव्वल कामगिरी केल्याबद्दल उपस्थितींनी समाधान व्यक्त केले.

पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतील डेडलिफ्ट स्पर्धेत एक सुवर्णपदक आणि अन्य एका वजनी गटात त्यांनी सुवर्णपदकाची कामगिरी केली. जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत ज्येष्ठ नागरिक अशोक दीक्षित यांनी दोन सुवर्णपदके प्राप्त करून जागतिक स्पर्धेत भारत देशाची शान उंचावली.



जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सहभाग नोंदविल्यानंतर अशोक दीक्षित त्या दृष्टीने आपले प्रशिक्षक श्रीबास गोस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पॉवरलिफ्टिंगचा सराव करत होते.

कल्याण पश्चिमेतील नमस्कार मंडळात ते मागील अनेक वर्ष क्रीडाविषयक आणि पॉवरलिफ्टिंगचा सराव करतात. शालेय जीवनापासून त्यांना पॉवरलिफ्टिंगची आवड होती. नोकरी करत असुनही आपल्या व्यायामात त्यांनी खंड पडू दिला नाही. आपले शरीर बांधूसद आणि पिळदार राहील यादृष्टीने त्यांनी आपली जीवनशैली ठेवली. त्यामुळे ६४ वर्षाचे असुनही ते आपल्या चेहऱ्यावर ज्येष्ठ नागरिक, वृध्दत्वाचा भाव न आणता नव्या उमद्या दमदार स्पर्धकाप्रमाणे या पॉवरलिफ्टिंग स्पर्धांमध्ये सहभागी होतात.

## वाड्यातील तरुणाचा अपघाती मृत्यू; अपूर्ण रस्त्याकामामुळे घडली दुर्घटना

**पालघर (सुचिता सोनावणे) :** वाडा परिसरात अपूर्ण रस्त्याच्या कामामुळे झालेल्या अपघातात एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. हि घटना गुरुवार, ०४ डिसेंबरला दुपारच्या सुमारास सुयोगनगर येथे घडली. अभिषेक नामदेव ढाकरे (वय १९ वर्ष) असे या मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. या घटनेबाबत वाडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, वाडा शहरातील मंगलपार्क परिसरात राहणारे आणि राज्य परिवहन महामंडळात कार्यरत असणारे नामदेव ढाकरे यांनी



दोन तासांपूर्वीच नवीन दुचाकी (स्कूटी) खरेदी करून घरी आणली होती. त्यांचा मुलगा अभिषेक नामदेव ढाकरे हा पेढे आणण्यासाठी वाडा बाजारपेठेत जायला निघाला असताना "मंगलपार्क – पाटील आळी" या दरम्यान असलेल्या सुयोग नगर येथील रस्त्यालगत पडून ठेवलेल्या मातीच्या मोठ्या ढिगाऱ्यावर दुचाकी (स्कूटी) चढली. वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ती थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या विद्युत खांबावर आदळली. या धडकेत अभिषेकच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

## २०० कोटीच्या विकासकामांच्या उद्घाटनासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शनिवारी डोंबिवलीत; पक्षीय प्रवेशांकडे नजरा

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** डोंबिवली शहरातील सांस्कृतिक, क्रीडाविषयक सुमारे २०० कोटीच्या कामांच्या भूमिपूजन सोहळ्यानिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शनिवारी, दुपारी चार वाजता डोंबिवलीत येणार आहेत. यावेळी शिवसेनेचे अनेक नेते, मंत्री उपस्थित राहणार आहेत. या विकास कामांबरोबर कोणत्या पक्षांमधून कोण कोण शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार आहे, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

डोंबिवली एमआयडीसीतील सावळाराम महाराज क्रीडासंकुलाचे अत्याधुनिकीकरण आणि तेथे अत्याधुनिक क्रीडाविषयक सुविधा उपलब्ध करून



देण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून शासनाने १८० कोटीचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच, छताचा भाग कोसळल्यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून बंद असलेल्या सावित्रीबाई फुले रंगमंदिराच्या नुतनीकरणासाठी टप्पा एक कामासाठी १५ कोटीचा निधी शासनाकडून उपलब्ध झाला आहे.

या दोन्ही कामांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत, कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी संध्याकाळी चार वाजता सावळाराम महाराज क्रीडासंकुल येथे करण्यात येणार आहे. सावित्रीबाई फुले नाट्यगृहासाठी आमच्या प्रयत्नातून निधी मिळाल्याचा भाजपचा दावा आहे. यावरून शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये रस्सीखेच आहे. यावेळी प्रेरणा युध्द स्मृति केंद्राचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

शिवसेना शिंदे गटातील अनेक पदाधिकारी, माजी नगरसेवक भाजपने फोडाफोडी करून आपल्या पक्षात दाखल करून घेतल्याने शिवसेनेत स्थानिक पातळीवर तीव्र नाराजी आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना फोडाफोडीच्या राजकारणावरून शिवसेनेकडून लक्ष्य केले जात आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे डोंबिवलीत येत आहेत. ते या राजकीय फोडाफोडीच्या विषयावर काय बोलतात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कोण कोणाला धक्के देत पक्ष प्रवेश करत आहे याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

कल्याण ग्रामीणमधील भाजपचा एक माजी नगरसेवक आणि त्यांचे समर्थक, कल्याण ग्रामीणमधील मनसेचा एका बडा नेता आपल्या समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा शहरातील नागरिक, राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## फुलपाखराच्या आकाराचा विना-सिग्नल उड्डाणपूल; नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला पनवेलची थेट जोड

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरातील दळणवळणाला नवे रूप देणारे प्रकल्प वेगाने पूर्णत्वाकडे जात आहेत. विमानतळाच्या पूर्व प्रवेशद्वारासाठी तयार होणारा ईस्टर्न एंट्री इंटरचेंज 'क्लोअर लीप' हा महत्त्वाचा प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचला असून पुढील सहा महिन्यांत तो सुरू होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ८०० कोटी रुपयांच्या निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) हे काम करत आहे. पनवेल शहर, खांदेश्वर रेल्वे स्थानक



परिसर आणि जेएनपीटी बंदरातून येणारी कंटेनर वाहतूक लक्षात घेऊन फुलपाखराच्या आकाराचा विना-सिग्नल उड्डाणपूल व जोडरस्त्यांचे जाळे तयार केले जात आहे.

या उड्डाणपुलाद्वारे गाढी नदीवरील खाडीमार्ग ओलांडून कंटेनर थेट विमानतळाच्या कार्गो प्रवेशद्वारापर्यंत पोहोचू शकतील, अशी या मार्गाची रचना करण्यात आली आहे.

याच धर्तीवर विमानतळाच्या उलवा बाजूस वेस्टर्न एंट्री इंटरचेंज या प्रकल्पाचे कामही सुरू आहे. या इंटरचेंजमुळे अटलसेतूवरून मुंबईच्या दिशेने आलेल्या वाहनांना थेट विमानतळ गाठता येईल.

हे दोन्ही इंटरचेंजचे प्रकल्प आखणी केलेल्या वेळेत पूर्ण करण्यासाठी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल आणि सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल हे सातत्याने यंत्रणेकडे पाठपुरावा करीत आहेत.

**ठाण्यातील रेल्वे प्रवाशांची कोंडी कळव्यात रोखणार...**

उड्डाणपुल, गोलाकार चौक व उंच मार्गांच्या जाळ्यामुळे नवी मुंबई व पनवेलचा विमानतळाशी अखंडित संपर्क साधला जाईल, ही पायाभूत सुविधा शहराच्या विकासाला मोठी गती देणारी ठरणार आहे.

**पनवेलची कोंडी फुटणार**

या प्रकल्पामुळे पनवेल शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार असून शीव–पनवेल महामार्ग, मुंबई–गोवा महामार्ग आणि अटलसेतू-पामबीच मार्गावरून येणाऱ्या प्रवाशांना विमानतळापर्यंत थेट पोहचता येईल.

कळंबोली सर्कल, खांदेश्वर, तसेच पनवेल शहर या परिसरातील वाहनचालकांना या मार्गाचा सर्वाधिक लाभ मिळू शकेल.

## कल्याणमध्ये जलवाहिनी फुटीचा शाळेला फटका

### रस्ता नसल्याने तीन दिवस शाळा ठेवावी लागली बंद

**कल्याण (गणेश बागडे) :** कल्याण डोंबिवली पालिकेची कल्याणमधील बैलबाजार ते शिवाजी चौक दरम्यानची एक भूमीगत जलवाहिनी मंगळवारी दुपारी फुटली. या जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठी या भागातील रस्ता बंद ठेवावा लागल्याने या बंदचा या भागातील एका नामचिन शाळेला फटका बसला. शाळेत येण्याचा मार्ग बंद झाल्याने अखेर शाळा व्यवस्थापनाला पालिकेच्या कामासाठी तीन दिवस शाळा बंद ठेवावी लागली.

भूमिगत जलवाहिनी फुटल्याने कल्याण पश्चिमेतील निम्मा शहराचा पाणी पुरवठा बंद झाला होता. हे काम तातडीने आणि वेळेत करणे आवश्यक होते. त्यामुळे पालिका पाणी पुरवठा विभागाने या कामासाठी आवश्यक यंत्रणा आणून हे काम सुरू केले होते. बैलबाजार ते शिवाजी चौक दरम्यान मेट्रो मार्गाची कामे सुरू आहेत. त्यामुळे या भागात अगोदरच वाहन कोंडी होते. त्यात जलवाहिनी दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने कोंडीत आणखी भर पडली. ही जलवाहिनी एका नामचिन शाळेच्या प्रवेशद्वार भागात फुटली होती. त्यामुळे या शाळेच्या प्रवेशव्दारासमोर खोदकाम करणे आवश्यक होते. हे सर्व काम करताना शाळेत बस, विद्यार्थी, पालक, शिक्षक, विद्यार्थी यांची वाहने येण्याचा मार्ग बंद झाला होता.


शाळेच्या मुख्य प्रवेशव्दारावर काम सुरू आहे. त्यात विद्यार्थी, पालक येजा करताना काही दुर्घटना घडली तर पुन्हा वादंग नको म्हणून शाळा व्यवस्थापनाने तीन दिवस शाळा बंद ठेवणे पसंत केले. या कामासाठी आडकाठी केली तर पुन्हा अत्यावश्यक कामात व्यवस्थापनाकडून आडकाठी करण्यात आली असा विषय उपस्थित झाला असता. त्यामुळे शाळा व्यवस्थापनाने सामंजस्याची भूमिका घेत शाळा तीन दिवस बंद ठेवणे पसंत केले.

# वातावरणीय बदलामुळे तूर, वाल शेतीचे गणित बिघडले

## वालाच्या शेंगांचे उत्पादन लांबणीवर; बाजारात नाशिक जिल्ह्यातून शेंगांची आवक

**भिवंडी (सम्यक कासारे) :** अवकाळी पावसाने प्रथमतः खरीप हंगामातील भातशेतीतून तोंडाशी आलेला घास शेतकऱ्यांकडून हिरावून घेतला. त्यानंतर रब्बी हंगामात भाजीपाला लागवड आणि कडधान्याची नासाडी केली आहे. त्यातच आता ऐन गुलाबी थंडीत वातावरणीय बदलाचा फटका तूर, वालाच्या शेंगा उत्पादक शेतकऱ्यांनाही बसल्याचे चित्र ठाणे - पालघर जिल्ह्यातून समोर येत आहे. कारण आतापर्यंत वालाच्या शेंगांचे उत्पादनच झालेले नाही. तर तूर शेंगाचे उत्पादनही मुबलक प्रमाणात झाल्याचे शेतातून स्पष्ट होत आहे. त्यामुळे शेंगा प्रेमींना ग्रामीण भागातील गावठी शेंगांसाठी वाट पहावी लागणार आहे.

तत्पूर्वी तूर, वालाच्या शेंगांची आवक



मार्गशिष महिन्यापासून चांगल्या प्रमाणात होत होती. मात्र मागील एक दोन वर्षांपासून अवकाळी पाऊस अधून मधून हजेरी लावत असल्याने वालाच्या शेंगांचे उत्पादन लांबणीवर जात असल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान सद्यस्थितीत ठाणे-पालघर मधील भाजीपाला बाजारातील उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगा ह्या अधिकतम नाशिक जिल्ह्यातून येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. त्यामुळे ऐन थंडीत शेंगा प्रेमींच्या जिभेला हव्या असणाऱ्या ग्रामीणमधील गावठी शेंगांच्या चवीचा आस्वाद घेता येत नसून गावठी शेंगांची पारख असलेले ग्राहकांची हिरमोड होत असून असे ग्राहक नाशिक जिल्ह्यातील शेंगा खरेदी करण्यास कानाडोळा करत असून गावठी शेंगांच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, पूर्वीपासून खरीप हंगामातील भात शेतीच्या लावणीच्या वेळेला शेत बांधावरील शेतात तूर, वालाच्या शेंगांच्या बियाणांची लागवड केली जात होती. त्या शेंगांचे उत्पादन मार्गशिष महिन्याच्या प्रारंभी होऊन बाजारात अशा गावठी शेंगांची आवक मोठ्या प्रमाणात होत होती. तर त्यानंतर भात कापणीनंतर लागवड केलेल्या वालाच्या शेंगांचे उत्पादन जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत मोठ्या प्रमाणात होत होते.

परंतु मागील काही वर्षांपासून च्या अवकाळीने भातशेतीसह भाजीपाला, कडधान्याचा अक्षरशः चुराडा केला असतानाच आता भातशेतीतील लावणी आणि कापणीचा कालावधी लांबल्याने तूर, वालाच्या शेंगांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचेही गणित कोलमडले असून शेंगांच्या उत्पादनाची प्रतीक्षा करावी लागत असल्याने शेतकऱ्यांना नुकसान सहन करावा लागत आहे.

अलीकडील बदलत्या हवामान स्थितीचा पिकांवर परिणाम होत असून ठाणे - पालघर जिल्ह्यात चालू हंगामात पावसाचा कालावधी अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे जमिनीत जास्त काळ ओलावा टिकून राहिला. परिणामी खरीप पिकांपैकी भात कापणीस विलंब झाला. याचा थेट परिणाम म्हणून रब्बी हंगामातील कडधान्य पिकांच्या पेरणीस उशीर झाला.विशेष म्हणजे खरीपातील वाल व तूर पिकांच्या वाढीवरही या हवामान बदलाचा प्रतिकूल परिणाम झाला आहे.

**शेतकऱ्यांना मार्गदर्शन आवश्यक**

दीर्घकाळ ओलावा व सूर्यप्रकाशाचा अभाव यामुळे या पिकांत फुलोरा येण्यास विलंब झाला असून पिकांची वाढ मंदावलेली दिसून येत आहे. दरम्यान दरांमध्ये अस्थिरता दिसत असली तरी कृषी विभाग परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून असून शेतकरी व व्यापाऱ्यांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. तर हवामानातील बदलानुसार पिक व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण व आंतरमशागत बाबत शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत आवश्यक मार्गदर्शन करण्यात येत आहे.

चालू खरीप हंगामात पावसाचा कालावधी वाढल्यामुळे जमिनीत ओलावा जास्त काळ राहिला. भात कापणी उशिरा झाली. त्यामुळे रब्बी हंगामातील कडधान्य पेरणी उशिरा झाली. तसेच खरीप मधील लागवड असलेली वाल, तूर पिकाच्या वाढीवर सुद्धा त्याचा परिणाम झाला असून फुलोऱ्यावर येण्याचा कालावधी वाढला. परिणामी दुसऱ्या जिल्ह्यातील आवक वाढली आहे. तसेच यावेळी ठाणे पालघर जिल्ह्यातील भातपिक शेतकऱ्यां प्रमाणेच तूर, वाल उत्पादनातील शेतकऱ्यांनाही वातावरणीय बदलामुळे मोठ्या प्रमाणात नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचे शिल्पकार

**भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी होऊन गेले आहेत की त्यांचे कार्य, विचार आणि जाणीवा एका कालखंडापुरत्या मर्यादित राहत नाहीत; त्या पिढ्यानपिढ्या समाजाला दिशा देतात, प्रेरणा देतात आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला नव्या उंचीवर नेतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असेच कालजयी व्यक्तिमत्त्व होय. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका नेत्याची आठवण नव्हे, तर न्याय, समता, स्वाभिमान आणि संघर्षाच्या मूल्यांना पुनश्च जागृत करणे होय. भारतातील दलित, वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी केलेले कार्य हे मानवाधिकार, सामाजिक लोकशाही आणि समतामूलक राष्ट्रनिर्मितीचे ध्वजवाहक होते.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी सुरुवातीला ज्या सामाजिक आणि ऐतिहासिक वास्तवात त्यांनी जीवनाची सुरुवात केली ते समजणे आवश्यक आहे. अस्पृश्यता ही जणू सामाजिक संस्थाच बनली होती. जन्म म्हणजे कर्म, आणि कर्म म्हणजे जात ही विचारधारा भारतीय समाजावर ठसवण्यात आली होती. परंतु या रूढीवाद, अवैज्ञानिकता आणि सामाजिक विषमतेचे निःशब्द बळी होण्याऐवजी त्यांनी त्याविरोधात बौद्धिक क्रांती उभारली. समाजाने दिलेली ओळख स्वीकारण्याऐवजी त्यांनी स्वतःची ओळख ज्ञान, संघर्ष आणि नेतृत्वातून घडवली. ते म्हणत असत की "माझे आयुष्य हे जन्माचे फळ नाही, तर माझ्या संघर्षाचे यश आहे."

त्यांनी शिक्षणाला मुक्तीचे माध्यम बनवले. शिक्षण मिळवणे हे जणू त्यांच्या जीवनातील सामाजिक अन्यायाविरुद्धचे पहिले युद्धच होते. समाजाने 'अस्पृश्य', 'अयोग्य' म्हणत जे दरवाजे बंद केले, ते त्यांनी मेहनतीने, बुद्धिमत्तेने आणि चिकाटीने उघडले. कोलंबिया विद्यापीठातून पीएच. डी., लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधील बॅरिस्टर, कायद्याची पदवी यामुळे ते फक्त भारतासाठीच नव्हे तर जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त विचारवंत ठरले. त्यांचे अध्ययन केवळ पुस्तकापुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक वास्तवाचे अभ्यासक होते. त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कायदा, राजकीय तत्त्वज्ञान, स्त्री-अधिकार, धर्म, इतिहास, मानवाधिकार आणि सामाजिक मानसशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत अभ्यास केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या व्यक्तीगत संघर्षातून उभा राहिला. जिथे एक 'जात' मनुष्याच्या अस्तित्वाचे मूल्य ठरवत होती, तिथे त्यांनी मानवतेचा, बंधुत्वाचा आणि समतेचा नवा सामाजिक अर्थ प्रस्तावित केला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा फक्त पाण्याचा प्रश्न नव्हता तर तो मानवी प्रतिष्ठा आणि मूलभूत हक्कांचा प्रश्न होता. त्या आंदोलनात "हम पानी लेंगे, हक्क से लेंगे!" असे त्यांनी सांगत भेदभावग्रस्त समाजाला पहिल्यांदा स्वाभिमानाची ताकद दिली.

नंतर नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहामध्ये त्यांनी धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले. "मनुष्य देवाच्या निर्मितीचा असतो, परंतु जातव्यवस्था मनुष्यांच्या बनावट नियमांची" ही घोषणा ज्या समाजात अस्पृश्यांना देवासमोर उभे राहण्याचा अधिकार नव्हता, त्या समाजात क्रांतिकारी होती. या आंदोलनांनी अस्पृश्यतेच्या भिंती फक्त हादरवल्या नाहीत, तर कोसळायला सुरुवात केली.

त्यांच्या सामाजिक कार्याचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे महिलांसाठी दिलेले अधिकार. स्त्रियांच्या शिक्षणाचे, समतेचे आणि स्वातंत्र्याचे त्यांनी सर्वाधिक जोरदार समर्थन केले. हिंदू कोड बिलच्या माध्यमातून स्त्रियांना संपत्ती, विवाह, घटस्फोट आणि पुनर्विवाहाच्या अधिकारांची हमी देण्याचा त्यांचा प्रयत्न हा स्त्री-मुक्तीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. तथापि, या सुधारणा मंजूर करण्यास विरोध झाल्याने त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देताना स्पष्टपणे सांगितले की "जे समाज स्त्रीला समानता देत नाहीत, त्यांची प्रगती कधीही होऊ शकत नाही."

भारतीय संविधानाच्या रूपात त्यांनी देशाला नव्या सामाजिक व्यवस्थेचा आराखडा दिला. हे संविधान फक्त कायद्यांचा संच नाही तर ते भारतीय नागरिकांच्या स्वातंत्र्याचे, सन्मानाचे आणि मानवाधिकारांचे संरक्षण करणारे जिवंत दस्तऐवज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की "राजकीय लोकशाही पुरेशी नाही; ती सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर आधारित असली पाहिजे." यामध्येच भारतीय समाजक्रांतीचे मूलतत्त्व दडलेले होते.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले. भारतातील शेतकरी, कामगार यांचे प्रश्न त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडले. जमीन सुधारणा, राष्ट्रीय जलनीती, औद्योगिकीकरण, बँकिंग क्षेत्र, वित्तीय व्यवस्थापन आणि कामगार कायदे या सर्व क्षेत्रांत त्यांनी मार्गदर्शक धोरणे मांडली. रिजर्व्ह बँकेच्या स्थापनेमागील त्यांची आर्थिक संकल्पना ही त्यांच्या अभ्यासाची खोली दर्शवणारी होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य फक्त समाजसुधारणेपुरते मर्यादित नव्हते तर ते मानवमुक्तीचे अभियान होते. त्यांनी धर्माच्या नावावर चालणाऱ्या अन्यायाला आव्हान दिले आणि अखेर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्विकारला. हा निर्णय संतापाचा नव्हता, तर आत्मसन्मानाचा आणि विवेकाधिष्ठित धर्माचा स्वीकार होता. ते म्हणाले होते की "मी हिंदू म्हणून जन्मलो, हे माझ्या हातात नव्हते; पण मी हिंदू म्हणून मरणार नाही, हे मी ठरवले." आणि या निर्णयातून त्यांनी भारतीय इतिहासाला नव्याने 'बौद्धयुग' दिले.

आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या विचारांकडे पाहतो तेव्हा एक प्रश्न उभा राहतो की त्यांचे स्वप्न कितपत पूर्ण झाले? संविधानाचा आदर करणे, समानता स्वीकारणे, जातभेद नष्ट करणे, मानवतेच्या मूल्यांचे पालन करणे ही मूल्ये आज अजूनही संघर्षात आहेत. जातीय हिंसा, सामाजिक विषमता, आर्थिक असमानता, महिलांवरील अत्याचार, धार्मिक ध्रुवीकरण आणि शिक्षणातला वर्गविचार आजही अस्तित्वात आहे. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक चळवळ संपलेली नाही तर ती अजूनही चालूच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मंत्र "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा मंत्र केवळ घोषवाक्य नसून सामाजिक परिवर्तनाचे क्रियासूत्र आहे. शिक्षण हे व्यक्तीला विचार देतं; संघटना व्यक्तीला शक्ती देते; आणि संघर्ष व्यक्तीला इतिहास बदलण्याची ताकद देतो. हा संघर्ष द्वेषाचा नाही; तर न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेच्या स्थापनेसाठी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची महत्ता फक्त भारतीय समाजापुरती मर्यादित नाही तर जगातील सामाजिक न्यायाच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मानवसंस्कृतीच्या इतिहासात अभिमानाने घेतले जाते. ते फक्त संविधानकार नाहीत; ते मानवतेचे अभियंते आहेत. ते फक्त नेता नाहीत; ते विचारयुगाचे निर्माता आहेत. ते फक्त इतिहासाचा भाग नाहीत; तर ते भविष्याचा मार्ग आहेत.

आज ६ डिसेंबर रोजी असणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्मृतीदिन हा केवळ अभिवादनाचा क्षण नसून जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. त्यांच्या कार्याचे, तत्त्वज्ञानाचे, सामाजिक उभारणीच्या दृष्टिकोनाचे अनुसरण करणे हीच खरी कृतज्ञता आहे. त्यांचा विचार जिवंत राहिला, न्यायव्यवस्था समतामूलक राहिली, समाजाने मनुष्याला मनुष्य म्हणून स्वीकारले तरच त्यांचे स्वप्न पूर्ण होईल. आपण सर्वांनी एकत्र येऊन केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला नव्हे, तर त्यांच्या विचारांना वंदन करणे ही काळाची गरज आहे.

अशा या ज्ञानाच्या प्रतीकला विनम्र अभिवादन.....

**- डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# TENxYOU ने आगामी हंगामात युवा खेळाडूंना तयार करण्यासाठी अग्रणी हॅरिस शील्ड स्पर्धा संघांसोबत सहकार्य केले आहे

TENxYOU ने प्रतिष्ठित हॅरिस शील्ड स्पर्धेत भाग घेणाऱ्या अव्वल आठ संघांसाठी क्रिकेट जर्सींच्या प्रायोजकत्वाची आज घोषणा केली. तळागाळातील क्रिकेट प्रतिभेचे पोषण करण्याच्या आणि पुढील पिढीच्या चॅम्पियन्सना पाठिंबा देण्याच्या TENxYOU च्या वचनबद्धतेवर ही भागीदारी जोर देते.

भारतातील सर्वात जुन्या आणि सर्वाधिक आदरणीय शालेय-स्तरीय क्रिकेट स्पर्धांपैकी एक असलेली हॅरिस शील्ड स्पर्धेचे हे १२९ वे वर्ष आहे. ही स्पर्धा क्रिकेटमधील असंख्य दिग्गजांसाठी एक सुरुवातीचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये, या स्पर्धेने सचिन तेंडुलकर, विनोद कांबळी, वसीम जाफर आणि रोहित शर्मा यांच्यासह अनेक जागतिक दर्जाचे क्रिकेटपटू दिले आहेत.

आपल्या समृद्ध वारसा आणि स्पर्धात्मक भावनेसाठी ओळखली जाणारी ही स्पर्धा भारतातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंच्या कारकिर्दीला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. दरवर्षी शेकडो शाळा यात भाग घेतात, हॅरिस शील्ड ही केवळ एक स्पर्धा नाही—तर



प्रतिभा, चिकाटी, आणि क्रिकेटच्या भावनेचा गौरव करणारी एक ती परंपरा आहे.

यावेळी बोलताना, क्रिकेट आयकॉन, TENxYOU चे सह-संस्थापक आणि चीफ इन्सपिरेशन ऑफिसर सचिन तेंडुलकर म्हणाले, "हॅरिस शील्डचे माझ्या मनात खूप खास स्थान आहे. त्या सामन्यांनी मला शिस्त, टीमवर्क आणि लवचिकता शिकवली—हे गुण माझ्या संपूर्ण कारकिर्दीत माझ्यासोबत राहिले. या स्पर्धेला पाठिंबा देण्याने युवा खेळाडूंना तोच मंच प्राप्त होईल, ज्याने माझ्या प्रवासाला आकार दिला."

TENxYOU चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सह-संस्थापक कार्तिक गुरुमूर्ती यांनी पुढे सांगितले की, "TENxYOU मध्ये, युवा प्रतिभेला लहान वयातच ओळखणे आणि त्यांना उज्ज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी पुरवणे यावर आमचा विश्वास आहे— असे भविष्य जिथे भारताचे खेळणे कधीच थांबणार नाही. हे प्रायोजकत्व केवळ जर्सी पुरवण्यापेक्षा अधिक आहे. हे युवा खेळाडूंना सक्षम बनवणे, त्यांच्या स्वप्नांना प्रोत्साहन देणे आणि भारतीय क्रिकेटसाठी एक मजबूत पाया तयार करणे आहे."

भविष्यादेखील TENxYOU खेळाडूंना उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी सर्वोत्तम उपकरणे आणि संसाधने पुरवून तळागाळातील स्तरावर आपला सहभाग अधिक वाढवण्याची योजना आखत आहे.

उच्च-गुणवत्तेच्या स्पोर्ट्स किटपासून ते प्रगत प्रशिक्षणाच्या सोयीपर्यंत सर्व देताना, या ब्रँडचे उद्दिष्ट आहे की प्रत्येक महत्त्वाकांक्षी क्रिकेटपटूला त्यांच्या पार्श्वभूमीची पर्वा न करता, भविष्य घडवण्याची संधी मिळेल याची खात्री करणे. TENxYOU ची संकल्पना अशी आहे की एक अशी क्रीडा परिसंस्था तयार करणे जिथे प्रतिभेला संधी मिळेल आणि भारतात जगाला प्रेरणादायी चॅम्पियन तयार होतच राहतील. हॅरिस शील्डसारख्या शालेय-स्तरीय स्पर्धांमध्ये गुंतवणूक करून, TENxYOU अशा भविष्याचा पाया रचत आहे जिथे क्रिकेट हा पुढील पिढ्यांसाठी अभिमान आणि उत्साहाचा स्रोत राहील.

# फेडएक्सने अत्याधुनिक इंटिग्रेटेड एअर हब सुरू केले



जगातील आघाडीची एक्सप्रेस वाहतूक कंपनी फेडरल एक्सप्रेस कॉर्पोरेशन (फेडएक्स) ने भारतातील आपली उपस्थिती आणखी वाढवून केंपेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातीलएआयएसएटीएस लॉजिस्टिक्स पार्कमध्ये ६०,०००चौ. फुटांचे अत्याधुनिक इंटिग्रेटेड एअर हब सुरू केले आहे. विमानतळाने आपली वार्षिक कार्गो हाताळणी क्षमता जवळपास दुप्पट वाढवून १ दशलक्ष मेट्रिक टन करण्याचा संकल्प केला असताना हा उपक्रम जाहीर झाला आहे. यामुळे बंगळूर एक महत्त्वपूर्ण कार्गो गेटवे म्हणून उदयास येत आहे, तसेच फेडएक्सची गुंतवणूक भारताच्या उत्पादन-केंद्रित आर्थिक वाढीच्या पुढील टप्प्याशी सुसंगत ठरत आहे.

आंतरराष्ट्रीय आयात-निर्यात हाताळणी क्षमता, ऑटोमेटेड प्रोसेसिंग सिस्टिम्स, यांत्रिक कन्व्हेयर्स, टेलिस्कोपिक बेल्ट आणि नॉन-कॉन्टॅक्ट डायनॅमिक डायमेन्शनिंगसाठी उच्च-गती DIM मशीन यांचा समन्वय साधत हे नवीन हब प्रदेशातील लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधा नव्या पातळीवर नेते. बॉन्डेड कस्टम्स सुविधा आणि शहर-ग्रामीण भागांशी निर्बाध कनेक्टिव्हिटीसह ही रचना वेळ-संवेदनशील औद्योगिक, औषधनिर्मिती आणि उत्पादन क्षेत्रातील शिपमेंट्सना अधिक जलद, विश्वसनीय आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

फेडएक्स इंडिया ऑपरेशन्स आणि प्लॅनिंग अँड इंजिनियरिंगचे उपाध्यक्ष सुवेन्दू चौधरी म्हणाले, "हे नवीन हब प्रगत इन्फ्रास्ट्रक्चरला स्मार्ट प्रक्रियांशी जोडून आमचे भारतातील नेटवर्क मजबूत करते. यामुळे ग्राहकांना अपेक्षित असलेली चपळता, लवचिकता आणि विश्वासार्हता मिळते तसेच सर्व आकारमानांच्या भारतीय व्यवसायांना जागतिक बाजारपेठांमध्ये आपली पोहोच आत्मविश्वासाने वाढवण्यास सक्षम करते."

एअर इंडिया एसएटीएस एअरपोर्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रामनाथन राजमणी यांनी सांगितले, "एआयएसएटीएस बीएलआर लॉजिस्टिक्स पार्कमध्ये फेडएक्सचे नवीन हब सुरू होणे हे बंगळूरमध्ये तंत्रज्ञानाधारित, अखंड आणि कार्यक्षम कार्गो ऑपरेशन्स उभारण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. हे पार्क भारताच्या लॉजिस्टिक्स परिसंस्थेला बळकट करण्यासंदर्भातील एअर इंडिया एसएटीएसची कटिबद्धता अधोरेखित करते. दक्षिण भारतातील उत्पादन व निर्यात वाढीला आवश्यक असलेल्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित करण्यात फेडएक्ससोबत भागीदारी करण्यास आम्हाला आनंद आहे."

सुरक्षा आणि कार्यक्षमता ह्या दोन मूल्यांवर आधारित असलेले फेडएक्सचे बंगळूर हब अत्याधुनिक इन्फ्रास्ट्रक्चर आणि आधुनिक ऑटोमेशनद्वारे ऑपरेशनल उत्कृष्टतेचा ध्यास घेते. हबमधील बहुविध कन्व्हेयर प्रणाली आणि ताशी अंदाजे ४००० पॅकेजेस हाताळण्याची क्षमता यामुळे प्रादेशिक नेटवर्कचे कार्यप्रदर्शन अधिक सुसंगत आणि वेगवान होते. विमानतळाच्या कार्गो परिसंस्थेच्या केंद्रस्थानी असल्याने ट्रान्झिट कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढते.

उन्नत इन्फ्रास्ट्रक्चर, मजबूत हवाई संपर्क आणि स्थानिक कौशल्याचा योग्य वापर करून फेडएक्स भारताच्या निर्यात-आधारित आर्थिक ध्येयांना सातत्याने बळ देत आहे. हे बंगळूर हब उच्च-मूल्य उद्योगांसाठी पुरवठा साखळीची लवचिकता वाढवते, संचालनाची विश्वासार्हता उंचावते आणि उत्पादन-चालित आर्थिक वाढ वेग घेण्याच्या भारताच्या उद्दिष्टांना दृढ समर्थन देते.

# RBI चे नवीन वर्षांचे गिफ्ट, कार, होम लोनचा EMI कमी झाला, खिशात पैसा खुळखुळणार

स्वतःचे घर, चारचाकी घेण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी मोठी आंनदवार्ता येऊन धडकली आहे. आरबीआयच्या पतधोरण समितीने रेपो दरात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. रेपो दर कमी करण्याच्या बाजूने सदस्यांनी मतदान केले आहे. ०.२५ टक्क्यांनी रेपो दरात कपात झाली आहे. त्यामुळे गृहकर्ज, वाहन कर्जावरील व्याजदरातही मोठी कपात होणार आहे. आता बँकांसह औद्योगिक आणि रिअल इस्टेट क्षेत्राला बहर येणार आहे. कारण अनेक जण ईएमआय कमी असल्याने घर आणि वाहन खरेदी करतील. आरबीआयने जणू नागरिकांना नवीन वर्षांचे गिफ्ट दिले आहे.

आरबीआयच्या पतधोरण समितीने (MPC) रेपो दरात ०.२५ टक्क्यांची कपात करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आरबीआयचा रेपो दर घसरून ५.२५ टक्क्यांवर आला आहे. यापूर्वी केंद्रीय रिझर्व्ह बँकेने फेब्रुवारी, एप्रिल आणि जून महिन्यात कपात केली होती. याचा अर्थ या कॅलेंडर वर्षात आरबीआयने ६ मधील ४ बैठकीत व्याजदर कपातीच्या बाजूने कौल दिला आहे. आतापर्यंत १.२५ टक्क्यांची कपात करण्यात आली आहे. ऑगस्ट आणि ऑक्टोबर महिन्यात आरबीआयच्या पतधोरण समितीने रेपो दरात कुठलाही बदल केला नव्हता. आता रेपो दरात कपातीचा निर्णय घेतल्याने येत्या काळातही रेपो दरात अधिक घसरण येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

यापूर्वी आरबीआय गव्हर्नरने व्याजदरात कपातीचे संकेत दिले होते. काही दिवसांपूर्वी आरबीआय गव्हर्नर यांनी महागाई वाढल्याचे कारण देत व्याजदर कपात टाळली होती. दिवाळीत ग्राहकांना ईएमआय कपातीचा आनंद मिळेल अशी अपेक्षा होती. पण तसे झाले नाही. मात्र वर्षाअखेर आरबीआयने व्याजदरात कपातीचे गिफ्ट सर्वसामान्यांना दिले आहे. अनेकांना आता घर आणि वाहन खरेदी करता येईल.

आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आर्थिक वर्ष २०२६ साठी GDP वृद्धी दर अंदाज वाढवून तो ७.३ टक्के केला आहे. हा अंदाज यापूर्वी ६.८ टक्के इतका होता. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे संकेतच केंद्रीय बँकेने दिले आहेत. विकास दर सातत्याने वाढत असल्याचे आणि अर्थव्यवस्था वेगाने धावत असल्याचे संकेत आरबीआयने दिले आहे.

# ४डब्ल्यूडी ट्रॅक्टर श्रेणीची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी महिंद्रा ट्रॅक्टर सज्ज

भारतातील नंबर १ ट्रॅक्टर ब्रँड आणि जगातील सर्वात मोठ्या महिंद्रा ट्रॅक्टरने त्यांच्या ४डब्ल्यूडी श्रेणीतील (फोर-व्हील ड्राइव्ह) ट्रॅक्टरची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी संपूर्ण पूर्तता केली आहे. महाराष्ट्र मध्ये शेती तसेच मालवाहतूक उपक्रमांमध्ये वाढ होण्याची अपेक्षा असल्याने, राज्यातील शेतकरी ४डब्ल्यूडी ट्रॅक्टरसह अधिक ऊर्जा आणि उत्पादकतेची निवड करत आहेत.

विविध पिकांसाठी खास उपकरणांचा वाढता वापर पाहता, महिंद्रा ४डब्ल्यूडी ट्रॅक्टर हे लहान आणि मोठ्या अशा दोन्ही प्रकारच्या शेतांसाठी, विशेषतः जिथे मातीची परिस्थिती वेगवेगळी आहे, अशा प्रदेशांसाठी अगदी योग्य आहेत.

२०-७०hp श्रेणीतील ४डब्ल्यूडी ट्रॅक्टरच्या विस्तृत श्रेणीपैकी एकासह, अर्जुन, नोवो, युवोटेक+, जिवो आणि ओज ट्रॅक्टर मालिकेतील त्यांच्या लोकप्रिय ट्रॅक्टर ब्रँडमध्ये महिंद्रा ४डब्ल्यूडी ट्रॅक्टर ऑफर करते. त्यांची कामगिरी सर्वोत्तम आहे आणि मार्केटमधील अशाच प्रकारच्या अन्य ऑफरपेक्षा लक्षणीय ऑपरेशनल फायदे मिळतात.

भारतीय शेतीच्या परिस्थितीनुसार भारतातच डिझाइन आणि विकसित केलेले, महिंद्राचे ४डब्ल्यूडी ट्रॅक्टर उत्तम डिझाइनसह मजबूत आहेत. टिकाऊपणा आणि मजबूत कामगिरीसाठी तयार केलेल्या या श्रेणीमध्ये हेवी-ड्युटी एक्सल, मोठे टायर आणि हायर ग्राउंड क्लिअरन्स अशी वैशिष्ट्ये आहेत. यामुळे ते कठीण कामे सहजपणे हाताळण्यासाठी आदर्श ठरतात.

ट्रॅक्टरच्या चारही चाकांमध्ये इंजिन पॉवर योग्यरित्या असल्यामुळे, ओल्या, असमान किंवा डोंगराळ प्रदेशात महिंद्रा ४डब्ल्यूडी ट्रॅक्टर उत्कृष्ट ट्रॅक्शन किंवा पकड देतात. यामुळे ते सर्व प्रकारच्या शेती तसेच बिगर शेती कामांसाठी आदर्श ट्रॅक्टर बनतात. आव्हानात्मक परिस्थितीत सातत्यपूर्ण ऑपरेशनसाठी ट्रॅक्टरची योग्य कार्यक्षमता आणि इंजिनचे दीर्घ आयुष्य, वाढीव इंधन कार्यक्षमता, टायरची कमी झीज या गोष्टी जागतिक दर्जाचे इंजिन तंत्रज्ञान निश्चित करते. यामुळे ट्रॅक्टरचा डाउनटाइम कमी होतो आणि महत्त्वाचे म्हणजे देखभालीचा खर्च कमी होतो.



या वैशिष्ट्यांशिवाय, महिंद्राचे ४डब्ल्यूडी ट्रॅक्टर सुधारित एर्गोनॉमिक्स, सुधारित सस्पेंशन सिस्टम, प्रगत सुरक्षा वैशिष्ट्ये आणि वापरणाऱ्याला सोईस्कर अशी नियंत्रणे देतात - ज्यामुळे देशभरातील शेतकऱ्यांना आराम तर मिळतोच पण त्यांची कार्यक्षमता वाढते.

महिंद्र ४डब्ल्यूडी ट्रॅक्टर वापरणाऱ्या शेतकऱ्यांना चांगले ऑपरेशनल नियंत्रण, वेगवान हेडलँड टर्न आणि २–३ टनापर्यंतच्या भारासह जड-ड्युटी कामे करण्याची क्षमता मिळते. यामुळे ऑपरेटर कमी दमतो आणि अपघातांचा धोका कमी होतो.

**जागतिक ट्रेंड आता भारतात**

महाराष्ट्र व्यतिरिक्त, भारताच्या अन्य भागातील शेतकरीसुद्धा ४डब्ल्यूडी ट्रॅक्टरचे फायदे वाढत्या प्रमाणात पाहात आहेत आणि ४डब्ल्यूडी ट्रॅक्टर तंत्रज्ञानाचा अवलंब करत आहेत. यामुळे जागतिक स्तरावर शेतीच्या कामात बदल होतो आहे. शेती आणि बिगर-शेती ऑपरेशन्स सुलभ करण्यासोबतच, वाढती जागरूकता आणि सरकारी अनुदाने देखील शेतकऱ्यांना ४डब्ल्यूडी मॉडेल्समध्ये अपग्रेड करण्यास प्रोत्साहित करत आहेत.

२डब्ल्यूडी ट्रॅक्टरच्या तुलनेत ४डब्ल्यूडी ट्रॅक्टरमध्ये सुरुवातीची गुंतवणूक जास्त असली तरी महिंद्रा ४डब्ल्यूडी ट्रॅक्टरचा टिकाऊपणा, इंधन कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढ कालांतराने गुंतवणुकीवर चांगला परतावा (ROI) सुनिश्चित करते. परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होणारे महिंद्रा ४डब्ल्यूडी ट्रॅक्टर किफायतशीर आहेत. तसेच ऑपरेशनचा एकूण खर्च कमी आहे.

गेल्या दशकात महिंद्राने त्यांच्या ४डब्ल्यूडी ऑफरमध्ये लक्षणीय वाढ केली आहे. यातूनच आधुनिक शेतीमध्ये महिंद्राच्या ट्रॅक्टरचे वाढते महत्त्व लक्षात येते. नागपूर, मुंबई, झहीराबाद, रुद्रपूर, राजकोट आणि जयपूर येथील ट्रॅक्टर उत्पादन सुविधांमधून महिंद्रा ट्रॅक्टर नवीन ४डब्ल्यूडी उत्पादने आणि व्यापक समाधानासह त्यांचा ४डब्ल्यूडी विस्तार देखील वाढवत आहे.

या ट्रॅक्टरना महिंद्राच्या विस्तृत डीलरशिप आणि सेवा केंद्रांचे पाठबळ आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि देखभालीची सोय लवकर उपलब्ध होते. मूळ सुटे भाग सहज आणि परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध आहेत, ज्यामुळे डाउनटाइम कमी होतो आणि कामकाज सुरळीत चालू राहते. महिंद्र ट्रॅक्टर सर्व्हिस टोल-फ्री संपर्क क्रमांक - १८०० २१०० ७०० - देतो जो २४x७ तास कार्यरत असतो आणि ग्राहकांना सोयीसाठी घरपोच सेवा देतो, ज्यामुळे त्यांना वाहतूक किंवा लॉजिस्टिक आव्हानांशिवाय वेळेवर मदत मिळते.

# घसा खवखवणेवर हे प्रभावी घरगुती उपाय अवलंबवा



जर तुम्हाला या हिवाळ्याच्या महिन्यांत घसा खवखवणे किंवा घसा दुखणे, वेदना किंवा खाज सुटणे असे अनुभव येत असतील तर हा लेख तुमच्यासाठी आहे. आज आम्ही काही घरगुती उपाय सांगणार आहोत जे तुम्हाला घशाच्या अनेक समस्यांपासून कमी वेळात मुक्ती मिळवण्यास मदत करू शकतात.

हिवाळ्यात घसा खवखवणे ही एक सामान्य समस्या आहे. घसा खवखवण्याची अनेक कारणे आहेत, ज्यात थंड वारे, अचानक तापमानात घट किंवा कोरडी हवा यांचा समावेश आहे. जेव्हा असे होते तेव्हा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते, ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो.

हिवाळ्यात घसा खवखवणे, खाज सुटणे, कोरडेपणा आणि गिळण्यास त्रास होणे हे सामान्य आहे आणि ते सहसा काही दिवसांतच कमी होते. तथापि, जर तुम्ही या काळात तुमच्या घशाची योग्य काळजी घेतली नाही तर या समस्या कायम राहू शकतात. काही घरगुती उपाय सांगणार आहोत जे तुम्हाला घसा खवखवणे, वेदना आणि खाज सुटणे यापासून खूप कमी वेळात आराम मिळवण्यास मदत करू शकतात. तर, चला हे उपाय जाणून घेऊ या.

**काळी मिरी**

घसा खवखवणे किंवा कर्कशपणा दूर करायचा असेल तर काळी मिरी वापरणे खूप फायदेशीर आहे. हे करण्यासाठी, झोपण्यापूर्वी सात काळी मिरी आणि त्याच प्रमाणात साखर मिसळून चावा. असे केल्याने तुमचा आवाज सुधारेल आणि सकाळी तो स्पष्ट होईल. घसा खवखवणे आणि कर्कशपणा दूर करण्यासाठी काळी मिरी आणि तुळशीचा काढा पिणे देखील फायदेशीर आहे.

**आल्याचा रस**

हिवाळ्यात घसा खवखवत असेल तर आल्याचा रस पिणे हा एक सोपा मार्ग आहे. आल्याचा रस काढा, त्यात लिंबाचा रस आणि खडे मीठ मिसळा आणि हळूहळू प्या. दिवसातून फक्त दोन ते तीन वेळा असे केल्याने घसा खवखवणे आणि जळजळ दूर होऊ शकते.

**ज्येष्ठमध, खडी साखर आणि आवळा**

तुम्हाला स्पष्ट बोलण्यात अडचण येत असेल किंवा घशात जडपणा येत असेल तर हा उपाय आदर्श आहे. तुम्हाला ज्येष्ठमध, साखर आणि आवळा (इंडियन गुसबेरी) लागेल. हे तीन घटक मिसळून एक काढा बनवा आणि तो प्या. दिवसातून दोनदा हा काढा प्यायल्याने तुमचा घसा साफ होईल आणि हलका वाटेल.

**जांभळाच्या बियांचा वापर**

घसा खवखवणे किंवा खोकला असेल तर हा उपाय फायदेशीर ठरू शकतो. मधात बेरीजची पावडर मिसळा आणि त्याचे लहान गोळे बनवा. दिवसातून तीन ते चार वेळा हे गोळे चोळा. असे केल्याने तुमचा खोकला आणि घसा खवखवणे काही वेळातच आराम मिळेल.

# चेहऱ्यावर चमक मिळवण्यासाठी टोमॅटोचा वापर करा

टोमॅटो प्रत्येक स्वयंपाकघरात आढळतो. यामुळे जेवणाची चव तर वाढतेच पण टोमॅटो तुमच्या आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन-सी आणि अँटीऑक्सिडंट मुबलक प्रमाणात आढळतात. ते तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्याचे काम करते. त्याचबरोबर आजीच्या रेसिपीमध्ये टोमॅटोचे अनेक उपयोग तुम्ही ऐकले असतील. हे तुमचे सौंदर्य वाढवण्याचे कामही करते. टोमॅटो चेहऱ्यावर चोळल्याने घाण साफ होते. यासोबतच त्वचेच्या छिद्रांमध्ये घट्टपणा येतो.टोमॅटोचे काही उपाय सांगणार आहोत. ज्याचा वापर करून तुम्ही तुमची त्वचा स्वच्छ आणि चमकदार बनवू शकता.



**टोमॅटो काप चेहऱ्यावर चोळा -** टोमॅटो कापून त्याचा तुकडा त्वचेवर चोळा. यानंतर १५ ते २० मिनिटे चेहरा असाच राहू द्या. नंतर स्वच्छ पाण्याने तोंड धुवा. ज्यांची त्वचा तेलकट आहे त्यांनी अशा प्रकारे टोमॅटो चेहऱ्यावर चोळावे. दुसरीकडे, कोरडी त्वचा असलेले लोक टोमॅटोच्या कापांमध्ये ऑलिव्ह ऑइलचे काही थेंब मिसळू शकतात. यामुळे तुमच्या चेहऱ्याचा रंग उजाळेल .

**टोमॅटोचा रस -** टोमॅटो चेहऱ्यावर अनेक प्रकारे वापरतात. याशिवाय टोमॅटोचा रस काढा. या रसात एक चमचा मध आणि काही थेंब पाणी किंवा गुलाबजल मिसळा. नंतर बर्फाच्या ट्रेमध्ये सेव्ह करा. क्यूब चेहऱ्यावर हलक्या हाताने लावताना मसाज करा. कोरडी त्वचा हायड्रेट करण्यासाठी ही रेसिपी वापरू शकता.

**दही आणि टोमॅटो -** चेहरा स्वच्छ आणि चमकदार बनवण्यासाठी एक चमचा टोमॅटोचा रस, एक चमचा मध आणि दोन थेंब ऑलिव्ह ऑईल मिसळा. आता हे मिश्रण व्यवस्थित मिसळा आणि चेहऱ्यावर आणि मानेला लावा. ते लावल्यानंतर १५-२० मिनिटे चेहरा तसाच राहू द्या. यानंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा. हा उपाय देखील चेहरा हायड्रेट ठेवतो.

**लिंबू आणि टोमॅटो -** लिंबू आणि टोमॅटोच्या मदतीन चेहरा उजाळेल. यासाठी किसलेल्या टोमॅटोमध्ये लिंबाचा रस मिसळा. नंतर त्यात एक चमचा बेसन चांगले मिसळा. आता हा पॅक तुमच्या चेहऱ्यावर आणि मानेवर लावा आणि २० मिनिटे राहू द्या. या उपायाने तुमच्या त्वचेची टॅनिंग दूर होते.

**मुलतानी माती आणि टोमॅटो -** मुलतानी मातीचेही अनेक फायदे आहेत. दुसरीकडे मुलतानी माती आणि टोमॅटो एकत्र लावल्याने चेहऱ्याला एक वेगळीच चमक येईल. यासाठी टोमॅटो किसून घ्या आणि त्या रसात गुलाब पाण्याचे काही थेंब मुलतानी माती आणि अर्धा चमचा ताज्या कढीपत्त्याची पेस्ट मिसळा. त्यानंतर ही पेस्ट चेहऱ्यावर वीस मिनिटे लावून कोरडी राहू द्या. यामुळे तुमची त्वचा सुधारेल.

**चंदन आणि टोमॅटो -** चेहऱ्यावर चमक आणण्यासाठी एका भांड्यात किसलेले टोमॅटो, एक चमचा कच्चे दूध आणि अर्धा चमचा चंदन एकत्र करून पेस्ट बनवा. यानंतर चेहरा आणि मानेवर लावा. नंतर १० मिनिटांनी धुवा. हा घरगुती फेस पॅक तुमच्या चेहऱ्याला अप्रतिम चमक देतो.

# हिवाळ्यात योगा करताना कधीही या चुका करू नका

हिवाळ्यात योगा करणे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. थंड वारे आणि कमी तापमानात योगा केल्याने शरीर उबदार राहण्यास मदत होते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. तथापि, या ऋतूत योगा करताना काही सामान्य चुका टाळणे महत्वाचे आहे.

बरेच लोक थंड सकाळी योगाभ्यास करण्यास उत्सुक असतात, परंतु शरीराची तयारी न करता कठोर आसने केल्याने दुखापत होऊ शकते. असं होऊ नये म्हणून हिवाळ्यात योगा करताना काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. चला जाणून घेऊ या.

**स्ट्रेचिंग करणे**

हिवाळ्यात शरीराचे तापमान कमी होते आणि स्नायू कडक होतात. शरीराला उबदार न करता ताणल्याने किंवा कठीण योगासन केल्याने स्नायूंमध्ये ताण, मोच किंवा दुखापत होण्याचा धोका वाढतो. म्हणून, योगा करण्यापूर्वी हलके वॉर्म-अप व्यायाम आणि स्ट्रेचिंग करणे महत्वाचे आहे.



**जेवणानंतर लगेच योगा करणे**

जड जेवणानंतर लगेच योगा केल्याने पचनक्रियेवर परिणाम होऊ शकतो आणि उलट्या किंवा पोटदुखीसारख्या समस्या उद्भवू शकतात. हिवाळ्यात अन्न अधिक हळूहळू पचते, म्हणून योगाभ्यासाच्या किमान १.५-२ तास आधी जेवण करावे.

**मोकळ्या हवेत योगा करणे**

हिवाळ्यात बाहेर योगा करताना उबदार राहणे महत्वाचे आहे. थंडीत उबदार कपड्यांशिवाय योगा केल्याने थंडी वाजून येणे, स्नायू कडक होणे आणि संसर्गाचा धोका वाढू शकतो. हलके जॅकेट किंवा थर्मल कपडे घाला.

**चुकीच्या आसनांचे किंवा तंत्रांचे पालन करणे**

हिवाळ्यात शरीर आळशी होते, त्यामुळे चुकीच्या पद्धतीने आसने केल्याने दुखापत होऊ शकते. योग्य योगा तंत्र, योग्य मुद्रा आणि श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. प्रशिक्षकाचा सल्ला घेतल्याशिवाय कोणतेही कठीण आसन करण्याचा प्रयत्न करणे टाळा.


**पुरेसे वॉर्म अप न करणे:**

थंड हवामानात वॉर्म अप न केल्याने रक्तप्रवाह कमी होतो आणि स्नायू कडक होतात. यामुळे स्ट्रेचिंग आणि योगासन धोकादायक बनतात. नेहमी कमीत कमी ५-१० मिनिटे हलका वॉर्म-अप करा.

विश्रांतीशिवाय आणि काळजीपूर्वक लक्ष न देता दीर्घकाळ योगाभ्यास केल्याने शरीरावर ताण येऊ शकतो. यामुळे स्नायू दुखणे, सांधे दुखणे आणि थकवा यासारख्या समस्या उद्भवू शकतात. हिवाळ्यात योगाभ्यासाचे सत्र लहान परंतु नियमित ठेवणे चांगले.

## मटार कटलेट

खाना-खजाना



**साहित्य :** उकडलेले मटार - २ वाट्या, उकडलेले बटाटे - २, रवा- अर्धी वाटी, किसलेलं कोबी, बीट, गाजर - १ वाटी, ब्रेड स्लाईस - ४ ते ५,आलं, हिरवी मिरची, लसूण पेस्ट - १ चमचा, धणे- जिरे पावडर - अर्धा चमचा, लिंबाचा रस - १ चमचा, मीठ - चवीनुसार,साखर - चवीनुसार, तेल, कोथिंबीर

**कृती :** एका भांड्यात उकडलेले मटार घ्या त्यात बटाटे मॅश करा. त्यातच किसलेलं गाजर, बीट आणि कोबी घाला. त्यात ब्रेड स्लाईस कुस्करून घाला. त्यात आलं, हिरवी मिरची, लसूण पेस्ट, धणे-जिरे पावडर, लिंबाचा रस, मीठ, साखर, कोथिंबीर घालून मिश्रण एकजीव करा. तयार मिश्रणाचे गोल कटलेट थापून ते रव्यात घोळवून घ्या.



# ‘कैरी’ चित्रपटात सुबोध भावेंची लक्षवेधी भूमिका; पोलिसाच्या वर्दीत दिसणार




‘कैरी’ हा मराठमोळा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात अभिनेत्री सायली संजीव, सुबोध भावे, सिद्धार्थ जाधव, शशांक केतकर, अरुण नलावडे, सुलभा आर्या हे कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. चित्रपटात अभिनेते सुबोध भावे हे महत्त्वाची आणि लक्षवेधी भूमिका बजावणार आहेत. यामध्ये ते पोलिसाच्या वर्दीत दिसणार आहेत.

पोलिसांची वर्दी सांभाळणं हे अर्थात अभिमानास्पद आहे. आणि हा अभिमान अभिनेता सुबोध भावेलाही जपावा असं नेहमी वाटायचं. बऱ्याच मुलाखतींमध्ये पोलीस व्हायचं स्वप्न होतं असं ते म्हणाले आहेत. आणि त्याचं हे स्वप्न ते अभिनय क्षेत्रात अभिनयाच्या वाटे पूर्ण करत आहेत. आगामी ‘कैरी’ या मराठी चित्रपटात सुबोध भावे पोलिसांच्या भूमिकेत दिसणार आहेत. पोलिसांच्या भूमिकेत काम करायचं स्वप्न ते या चित्रपटाद्वारे पूर्ण करत आहेत.

फॉरेन पोलिसांच्या भूमिकेत ते या चित्रपटात दिसणार आहेत. याची झलक ट्रेलरमध्ये पाहायला मिळाली. ट्रेलरमधील त्यांची ही करारी भूमिका चाहत्यांना चित्रपटातील त्यांच्या भूमिकेची उत्सुकता वाढवत आहे. या भूमिकेबाबत बोलताना सुबोध भावे म्हणाले की, ‘यंदा हिवाळ्यातच आपणा सर्वांना कैरी चाखायला मिळणार आहे. आणि ही कैरी आंबट-गोड वा नेमकी कशी असणार हे मात्र १२ डिसेंबरला कळेल. कारण माझा ‘कैरी’ हा आगामी सिनेमा भेटीस येतोय’. दरम्यान, येत्या १२ डिसेंबरला हा चित्रपट महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे.

# क्रिती सेनॉन-धनुषचा पहिल्या आठवड्यातच बंपर धमाका!; ‘तेरे इश्क में’ १०० कोटी पार

क्रिती सेनॉन आणि धनुषचा ‘तेरे इश्क में’ चित्रपटाने पहिल्या आठवड्यातच १०० कोटींची कमाई करत बॉक्स ऑफिसवर मोठा धमाका केला आहे. प्रेक्षकांच्या उत्तम प्रतिसादामुळे चित्रपट सुपरहिटकडे वाटचाल करत आहे.

बॉलीवूडची चर्चि त जोडी क्रिती सेनॉन आणि धनुष यांचा ‘तेरे इश्क में’ हा चित्रपट रिलीज होताच बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. चित्रपटाने पहिल्या आठवड्यातच १०० कोटींचा टप्पा पार करत ११८.७६ कोटींची बंपर कमाई केली आहे. पहिल्या दिवशी दमदार ओपनिंग घेतलेल्या या चित्रपटाने विकेंडमध्ये जोरदार गती पकडली. ट्रेड ॲनालिस्ट यांच्या माहितीनुसार, चित्रपटाने सात दिवसांत देशांत ८२ कोटींच्या दरम्यान तर परदेशातील कमाई अशी एकूण ११८ कोटी कमावले आहेत. या आकड्यांमुळे तेरे इश्क में हा वर्षातील सर्वाधिक दमदार सुरुवात करणाऱ्या चित्रपटांपैकी एक ठरला आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, भारतात सातव्या दिवशी ५.७ कोटींची कमाई केली. विकेंडचा आकडा ८३.५५ कोटी झाला. तर वर्ल्डवाईड कमाई १०८ कोटी रुपये झाली. पहिल्या दिवशी १६ कोटी, दुसऱ्या दिवशी १७ कोटी, तिसऱ्या दिवशी १९ कोटी रुपये. चौथ्या दिवशी ८.७५ कोटी, पाचव्या दिवशी १०.२५ कोटी, सहाव्या दिवशी ६.८५ कोटी रुपयांची कमाई चित्रपटाने केलीय.क्रिती सेनॉनने अलीकडच्या काळात ‘मिमी’, ‘गणपथ’,




‘द क्रू’ यांसारख्या विविध भूमिकांमुळे स्वतःला एक बहुआयामी उत्तम अभिनेत्री म्हणून सिद्ध केले आहे. तर धनुषला वेगळी ओळख निर्माण करायची गरज नाही. तो नेहमीच आपल्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांची गर्दी खेचून आणण्यास यशस्वी ठरला आहे. या दोघांच्या फ्रेश केमिस्ट्रीमुळे तेरे इश्क में तरुण वर्गात खासकरून कपल्सच्या पसंतीस उतरला आहे.

यावर्षी धनुषचे बॉक्स ऑफिसवर ३ चित्रपट रिलीज झाले आहेत. त्यापैकी तेरे इश्क में हा एक सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. त्याचा मागील चित्रपट, कुबेराने १२० कोटी बजेटमध्ये ११५ कोटी कमावले होते. नंतरचा चित्रपट इडली कडाईने ७१.३२ कोटींचा गल्ला जमवला होता.‘तेरे इश्क में’ हा धनुषचा दुसरा हिंदी चित्रपट आहे. त्याआधी तो सोनम कपूर सोबत ‘रांझणा’ चित्रपटात काम केले आहे. त्यावेळी त्यांची केमिस्ट्री फॅन्सना आवडल होती. आता तेरे इश्क मे च्या निमित्ताने धनुषच्या रांझणाचीही चर्चा होऊ लागली.

# धुरंधरमध्ये अक्षय खन्ना रणवीर सिंगवर पडला भारी; प्रेक्षकांकडून सोशल मीडियावर अक्षय खन्नाला अवॉर्ड देण्याची मागणी

आदित्य धर दिग्दर्शित ‘धुरंधर’ हा चित्रपट शुक्रवारी ५ डिसेंबर रोजी प्रदर्शित झाला. हा चित्रपट २०२५ मधील सर्वात चर्चेत असणाऱ्या चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटात रणवीर सिंग, संजय दत्त, अर्जुन रामपाल, अक्षय खन्ना आणि आर. माधवन मुख्य भूमिकेत आहेत. ‘धुरंधर’ या चित्रपटाला नक्कीच चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. प्रेक्षकांकडून येणाऱ्या प्रतिक्रिया या सकारात्मक आहे. याचा अर्थ हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. चित्रपट रिलीज होण्याआधी चित्रपटातील रणवीर सिंगच्या भूमिकेची सर्वाधिक चर्चा होत होती. चित्रपट रिलीज झाल्यानंतरही त्याच्या भूमिकेला तेवढाच चांगला प्रतिसाद



मिळाला आहे. पण त्याच्यापेक्षाही एका अभिनेत्याचा भूमिकेला सर्वाधिक पसंती मिळताना दिसत आहे. धुरंधरमध्ये रणवीर सिंगवरही भारी पडलेला अभिनेता म्हणजे अक्षय खन्ना. चित्रपटात अक्षय खन्नाने साकारलेल्या गँगस्टर रहमान डकोइटच्या भूमिकेला प्रेक्षकांकडून मोठ्या प्रमाणात दाद मिळाली आहे.चित्रपटातील त्याच्या दमदार अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. एवढंच नाही तर अक्षयचा अभिनय प्रेक्षकांना एवढा आवडला की सोशल मीडियावर त्याला अवॉर्ड देण्याची मागणी करत आहेत.

अक्षय खन्ना हा एक उल्लेखनीय अभिनेता आहे. त्याने बॉलीवूडमध्ये नायक म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली होती, परंतु आता त्याला खरी ओळख आणि लोकप्रियता मिळत आहे. त्याने बऱ्याच अशा भूमिका साकारल्या आहेत ज्या पाहून चाहत्यांनी खरोखरंच कौतुकासोबतच आश्चर्य व्यक्त केलं. अक्षय खन्नाने केलेल्या अशाच दमदार भूमिकांबद्दल जाणून घेऊ.

**‘छावा’**

अक्षय खन्नाने साकारलेली खलनायकाची भूमिकाही प्रेक्षक डोक्यावर घेताना दिसतात. याचं उत्तम उदाहरण म्हणजे लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित ‘छावा’ चित्रपट. या चित्रपटात अक्षय खन्नाने औरंगजेबाची भूमिका साकारली होती. निर्दयी आणि क्रूर सम्राटाच्या त्याच्या भूमिकेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक झाले.

**‘दृश्यम २’**

ब्लॉकबस्टर सस्पेन्स थ्रिलर ‘दृश्यम २’ मध्ये अक्षय खन्ना एका हुशार पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारली आहे, जो अजय देवगणचे पात्र विजय साळगावकर आणि त्याच्या कुटुंबाशी संबंधित एका कथित खून प्रकरणाचा तपास करतो. त्याची ही भूमिका ही नक्कीच हटके आणि त्याच्या शैलितून त्याने सादर केली.

**‘दिल चाहता है’**

दिल चाहता है फरहान अख्तरने दिग्दर्शित केला होता. यात आमिर खान, सैफ अली खान आणि अक्षय खन्ना मुख्य भूमिकेत होते. दिल चाहता है हा चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीला बदलून टाकणाऱ्या चित्रपटांपैकी एक मानला जातो.

**‘हमराझ’**

अब्बास-मस्तानच्या कल्ट थ्रिलर ‘हमराझ’ मध्ये अक्षय खन्नाने खलनायकाची भूमिका केली होती. ज्यामध्ये बॉबी देओल आणि अमिषा पटेल देखील होते. त्याचा अभिनय उल्लेखनीय होता. आणि अभिनयासोबतच त्याने केलेल्या डान्सचे देखील तेवढेच कौतुक झाले.

**‘तीस मार खान’**

२०१० मध्ये अक्षय कुमारचा ‘तीस मार खान’ हा चित्रपट प्रदर्शित झाला. त्यात अक्षय खन्नाने अभिनेता आतिश कपूरची भूमिका साकारली होती, ज्याने पॉप संस्कृतीत लोकप्रियता मिळवली आहे. यात त्याची भूमिका काहीशी कॉमेडीकडे झुकणारी होती. पण त्याने ती देखील उत्तम प्रकारे साकारली.

**‘बॉर्डर’**

११९७ मध्ये प्रदर्शित झालेला ‘‘बॉर्डर’’ हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर एक मोठा ब्लॉकबस्टर ठरला. अक्षय खन्नाने या चित्रपटात एका तरुण लष्करी अधिकाऱ्याची भूमिका केली होती. सनी देओल, सुनील शेट्टी आणि इतर अनेक स्टार्स देखील या चित्रपटाचा भाग होते.या चित्रपटातील प्रत्येकाच्या भूमिका लक्षात राहण्यासारख्या आहेत. त्यातच अक्षय खन्नाच्या भूमिकेचंही कौतुक झालं होतं.

# ‘दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे’ ला ३० वर्षे पूर्ण, लंडनमध्ये शाहरुख- काजोलचा पुतळा

बॉलिवूडचा आयकॉनिक सुपरहिट चित्रपट ‘दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे’ (DDLJ) प्रदर्शित होऊन ३० वर्षे पूर्ण झाली आहेत. नुकतेच या चित्रपटात मुख्य भूमिका साकारणाऱ्या अभिनेता शाहरुख खान आणि अभिनेत्री काजोलने लंडनमध्ये त्यांच्या कांस्य पुतळ्याचे अनावरण केले. त्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

चित्रपटातील राज आणि सिमरन यांच्या आयकॉनिक पोजमध्ये हा पुतळा उभारण्यात आला आहे. पुतळ्याच्या अनावरणावेळी दोन्ही कलाकारांनी एकत्र फोटोही काढले. यावेळी शाहरुख काळ्या सूटमध्ये दिसला तर काजोल निळ्या साडीत सुंदर दिसत होती. शाहरुखने या संदर्भात इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर करत आपल्या भावना व्यक्त




केल्या आहेत.

पोस्टमध्ये शाहरुखने म्हंटल आहे की, ‘आज लंडनच्या लेस्टर स्क्वेअरवर राज आणि सिमरन यांच्या कांस्य पुतळ्याचे अनावरण करताना खूप आनंद होत आहे, दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे (DDLJ) या चित्रपटाच्या ३० व्या वर्षाचे औचित्य साधून हे अनावरण झालं. DDLJ हा पहिला भारतीय चित्रपट आहे ज्याला ‘सीन्स इन द स्क्वेअर’ या ट्रेलमध्ये पुतळा उभारून सन्मानित करण्यात आलं’.

दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे या चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य चोप्रा यांनी केले होते. हा चित्रपट आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे. यातील राज आणि सिमरन या पात्रांनी हिंदी चित्रपटसृष्टीत एक वेगळी ओळख निर्माण केली. हा भारतातील सर्वात जास्त काळ चाललेला चित्रपट आहे, जो आजही मुंबईतील मराठा मंदिर चित्रपटगृहात दाखवला जातो.

# घरात पूजा करताना वास्तुशास्त्राचे ‘हे’ नियम महत्तवाचे

हिंदू धर्मात दररोज नियमितपणे देवाची पूजा करण्याला महत्त्व आहे. त्यामुळं घरोघरी आपापल्या प्रथा- परंपरेनुसार देवपूजा केली जाते. वास्तुशास्त्रात काही नियम सांगण्यात आले आहेत. त्यामुळं पूजेचं शुभ फळ मिळण्यासाठी या नियमांचं पालन करणं गरजेचं आहे.

देवाची पूजा करताना सर्वात पहिला नियम म्हणजे पूजास्थळ नेहमीच स्वच्छ असावं. हिंदू श्रद्धेनुसार, पवित्र जागी देवांचा वास असतो. त्यामुळं तुम्ही ज्या ठिकाणी पूजा करता ती जागा नेहमी पवित्र आणि स्वच्छ ठेवा. असे केल्याने, त्याजागी सकारात्मक



ऊर्जा नेहमीच टिकून राहील.

देवाच्या पूजेचा दुसरा नियम म्हणजे पूजा करताना नेहमी शरीर आणि मन शुद्ध करून आणि स्वच्छ कपडे परिधान करून पूजा करावी. देवाची पूजा करताना काळे कपडे घालणे अशुभ ठरतं.योग्य ठिकाणी आणि योग्य दिशेला देवाची पूजा करणे आवश्यक आहे. वास्तुशास्त्रानुसार, देवाची पूजा घराच्या ईशान्य दिशेला करावी आणि पूजा करताना तुमचे तोंड पूर्व, उत्तर किंवा ईशान्य दिशेला असावं. जर तुम्हाला पूजेचं योग्य फळ मिळत नसेल तर नेहमी पूजा सुरू करण्यापूर्वी विघ्नहर्ता श्रीगणेशाची पूजा करावी. वास्तुशास्त्रानुसार, देवघराजवळ सुकलेली फुले, तुटलेल्या मूर्ती, इत्यादी वस्तू ठेवू नयेत. तुटलेली मूर्ती घरात ठेवणे वास्तुदोषाचे कारण मानले जाते. अशा मूर्ती घरात असल्यास वाहत्या पाण्यात विसर्जित कराव्यात.अपवित्र अवस्थेत किंवा सुतक काळात देवघर किंवा मूर्तींना आणि देवाच्या फोटोंना कधीही स्पर्श करू नये. तसेच रात्री देवाची पूजा करताना घंटा किंवा शंख वाजवू नये.सर्वात महत्त्वाचे म्हणजे आरतीशिवाय देवाची पूजा अपूर्ण मानली जाते, म्हणून पूजा संपल्यानंतर श्रद्धेने आरती करावी. त्याचप्रमाणे पूजा करताना झालेल्या चुकांसाठी देवाला क्षमा मागावी.

# परफ्यूम काचेच्या बाटलीतच का ठेवतात?; अनेक लोकांना माहित नसेल नेमकं कारण

परफ्यूम ही फक्त सुगंधाची बाटली नसून व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. बाजारात अनेक प्रकारचे परफ्यूम उपलब्ध असतात, पण एक गोष्ट मात्र कायम दिसते जवळपास सर्व परफ्यूम काचेच्या बाटल्यांमध्येच भरलेले असतात. प्लास्टिकची बाटली हलकी आणि स्वस्त असूनही परफ्यूम कंपन्या काचेला प्राधान्य का देतात? यामागे काही महत्त्वाची कारणे आहेत जी अनेकांना माहिती नसतात.

**सुगंध अबाधित ठेवण्यासाठी काच सर्वोत्तम**

परफ्यूममध्ये आवश्यक तेल आणि अल्कोहोल असतात. हे घटक नाजूक असतात आणि वातावरणातील बदलांना पटकन प्रतिक्रिया देतात. प्लास्टिकच्या बाटलीत परफ्यूम ठेवला तर प्लास्टिकमधील रसायने सुगंधावर परिणाम करू शकतात. त्यामुळे परफ्यूमचा मूळ सुगंध बदलतो किंवा कालांतराने



खराब होतो. काच मात्र नॉन-रिॲक्टिव्ह असल्याने सुगंध जसाच्या तसा टिकतो.

**प्रकाश आणि उष्णतेपासून संरक्षण**

परफ्यूमला सूर्यप्रकाश आणि जास्त उष्णतेपासून दूर ठेवणं आवश्यक आहे. प्रकाशामुळे त्यातील संयुगे तुटतात आणि सुगंधाची तीव्रता कमी होते. काचेच्या गडद किंवा फ्रोस्टेड बाटल्या प्रकाश आत येऊ देण्याचे प्रमाण कमी करतात. प्लास्टिक इतके संरक्षण देत नाही, त्यामुळे परफ्यूम लवकर खराब होण्याचा धोका वाढतो.

**रसायनांपासून सुरक्षितता**

काळानुसार प्लास्टिकमधील सूक्ष्म कण द्रवात मिसळू शकतात. यामुळे सुगंध तर बदलतोच, पण त्वचेला ॲलर्जी किंवा जळजळ होऊ शकते. काच पूर्णपणे सुरक्षित आणि निष्क्रिय असल्याने परफ्यूमची गुणवत्ता दीर्घकाळ टिकून राहते.

**प्रीमियम लूक आणि टिकाव**

परफ्यूम हा लक्झरी प्रॉडक्ट मानला जातो. काचेची बाटली त्या उत्पादनाला एक आकर्षक आणि प्रीमियम लूक देते. वजनाने थोडी जड असली तरी टिकाऊ आणि दीर्घकाळ वापरण्यास योग्य असते. प्लास्टिकच्या बाटल्यांना हा क्लासिक आणि गुणवत्तेचा लूक मिळत नाही.

**सुगंधाची शुद्धता जपण्यासाठी काचच योग्य**

परफ्यूमचा सुगंध खूप नाजूक असतो आणि परदेशी वास किंवा दूषित कणांमुळे त्याची गुणवत्ता घटू शकते. प्लास्टिकला कधी कधी स्वतःचा हलका वास येतो, जो परफ्यूमवर परिणाम करू शकतो. काच मात्र गंधहीन असते, त्यामुळे सुगंधाची शुद्धता कायम राहते.

**परफ्यूम कसा साठवावा?**

परफ्यूमची गुणवत्ता टिकवण्यासाठी योग्य साठवणूक तितकीच महत्त्वाची आहे.

– बाटली नेहमी घट्ट बंद ठेवा.

– परफ्यूम थंड ठेवा.

– थेट सूर्यप्रकाशापासून दूर ठेवा.

– फ्रिजमध्ये ठेवण्याची गरज नाही; खोलीच्या तापमानावर ठेवला तरी पुरेसा टिकतो.

परफ्यूम काचेच्या बाटलीत ठेवण्यामागे सौंदर्याबरोबरच वैज्ञानिक कारणेही तितकीच महत्वाची आहेत. सुगंध जपणे, गुणवत्ता टिकवणे, सुरक्षितता आणि दीर्घकालीन टिकाऊपणा या सर्व गोष्टींमुळे काच हा परफ्यूमसाठी सर्वोत्तम पर्याय ठरतो. त्यामुळे पुढच्या वेळेस परफ्यूम खरेदी करताना बाटली काचेची आहे याची खात्री करा.




**मेष** – ठरवलेली कामे कामे पार पाडाल. योग्य अनुमान काढाल. तारतम्याने वागा. सामाजिक बांधिलकी जपाल. प्रेमाला चालना मिळेल.

**वृषभ** – मित्र मदत करतील. खाण्याची काळजी घ्या. नोकरीत टिकून राहता येईल. इतरांच्या वागण्याचा फार विचार करू नका.

**मिथुन** – अनुभवी व्यक्तींचे सहकार्य मिळेल. नातेवाईकांची ये-जा वाढेल. विरोध मोडून काढता येईल. नव्या कामास आरंभ करा.

**कर्क** – भागीदारीतील कार्यात पुढाकार घ्याल. कौटुंबिक समस्या सोडवाल. वाटाघाटीत तणाव होईल. नोकरी टिकवा. वेळेला महत्त्व द्या.

**सिंह** – जोडीदाराचा वरचष्मा राहील. उत्तम वैवाहिक सौख्य लाभेल. सहकाऱ्यांची नाराजी पत्करू नका. चारचौघांत कौतुक होईल.

**कन्या** – एकलकोंडेपणा दूर होईल. सर्वांशी सौजन्याने वागा. धार्मिक कामात पुढाकार घ्याल. परोपकाराचे महत्त्व पटवून द्याल.

**तूळ** – धंद्यात मोठा फायदा होईल. घरातील कामे होतील. आनंदी राहाल. आर्थिक व्यवहारात सतर्क राहा. शैक्षणिक कामे होतील.

**वृश्चिक** – आपल्या आत्मविश्वासात भर पडेल. धंद्यात वाद तसेच अरेरावी करू नका. सामाजिक कार्याला हातभार लावाल.

**धनु** – मनाप्रमाणे घटना घडतील. वाटाघाटीचा प्रश्न मार्गी लावाल. चौकसपणे विचार करावा. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका.

**मकर** – वरिष्ठांकडून कौतुक केले जाईल. स्वतःच्या मर्जीने वागाल. कुणालाही कमी समजू नका. वृद्ध व्यक्तीची चिंता वाटेल.

**कुंभ** – कार्यपद्धतीचे कौतुक केले जाईल. भावंडांचे सहकार्य मिळेल. वरिष्ठांशी मिळते जुळते धोरण स्वीकारावे. धंद्यात वाढ होईल.

**मीन** – कौटुंबिक आनंद वाढेल. गैरसमजापासून दूर राहा. धार्मिक गोष्टींची आवड दर्शवाल. आपली साहित्याची आवड जोपासाल.

# सरकारी जमिनीवरील अनधिकृत बांधकाम प्रकरणात दोन अधिकाऱ्यांची नावे कोर्टात सादर; उच्च न्यायालयानं निकाल ठेवला राखीव

**मुंबई (विशाल कारंडे) :** दिवसेंदिवस ठाण्यात फोफावत चाललेल्या अनधिकृत बांधकामांवरून मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारसह ठाणे महापालिकेची (TMC) गुरूवारी पुन्हा एकदा खरडपट्टी काढली. बऱ्याचदा हे प्रशासकीय अधिकारीच अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालतात. त्यांच्यामुळेच अशा बांधकामांना पाणी आणि विजेचं कनेक्शन मिळत ही बाब अधोरेखित करत हायकोर्टानं आपला निकाल राखून ठेवला. मात्र, त्यापूर्वी वकिलांकडून संबंधत अधिकाऱ्यांची नावही जाणून घेतली.

**काय आहे प्रकरण :** भूमाफियांनी ठाण्यातील पातलीपाडा, कोलशेत येथील गायरान जमिनी ताब्यात घेत त्यावर बेकायदा बांधकामे उभारलीत. या सरकारी जमिनीवरील अनधिकृत बांधकामं हटवण्यात यावीत तसेच संबंधितावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करत काही रहिवाशांनी हायकोर्टात वकील श्रीराम कुलकर्णी यांच्यामार्फत जनहित याचिका दाखल केलीय. या याचिकेवर गुरुवारी न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. गेल्या सुनावणीत हायकोर्टानं पालिका प्रशासनाला जबाबदार धरत दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार?, त्याबाबत माहिती सादर करण्याचे आदेश ठाणे महापालिकेला दिले होते.

**ठाणे मनपाची भूमिका :** ठाणे महापालिकेचे (टीएमसी) उपायुक्त दिनेश तायडे यांनी याबाबत आपलं प्रतिज्ञापत्र सादर करत त्यात म्हटलंय, की अनधिकृत बांधकामप्रकरणी तहसीलदारांकडे अर्ज करण्यात आले आहेत. अद्याप, ते प्रलंबित आहेत. तर महापालिकेच्यावतीनं संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती हायकोर्टात देण्यात आली. मात्र, हायकोर्टानं त्यावर नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांची नावं सादर करण्याचे आदेश महापालिकेला दिले. त्यानुसार दुपारच्या सत्रात



दोन अधिकाऱ्यांची नावं हायकोर्टात देण्यात आली. न्यायालयानं याची गंभीर दखल घेत या प्रकरणावरील आपला अंतिम निकाल राखून ठेवलाय.

**टीएमसीच्या भूमिकेवर हायकोर्टाची नाराजी :** ठाणे पालिकेच्यावतीनं ज्येष्ठ वकील राम आपटे यांनी युक्तिवाद करताना कोर्टाला सांगितलं की, दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्यावर नाराजी व्यक्त करत, एवढी वर्ष काय केलंत? अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांवर काय कारवाई केलीत? असे सवाल करत न्यायालयानं महापालिकेच्या युक्तिवादावर असमाधान व्यक्त केलं. ठाणे महापालिकेच्यावतीनं दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले की, कुठल्या भूखंडांवर किती बांधकामं अधिकृत आहेत? तर किती अनधिकृत बांधकामं आहेत. मात्र, याची शहानिशा करण्यासाठी सर्वेक्षण करणं आवश्यक आहे. त्यासाठी किमान सहा महिन्यांचा अवधी आवश्यक असून अधिकृत बांधकामांचे क्लस्टरद्वारेच पुनर्वसन होणार आहे.

**मागील सुनावणीत काय घडलं? :**अनधिकृत बांधकामांच्या मुद्द्यावरून मुंबई उच्च न्यायालयानं सोमवारी (१ डिसेंबर) ठाणे महापालिका प्रशासनाला सुनावलं. शहरात दिवसेंदिवस अनधिकृत बांधकामांचं पेव फुटलंय असताना ठाणे महापालिकेकडून डोळेझाक का? असं म्हणत २०१० पासूनच्या या बांधकामांना जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई का नाही?, असा सवाल मुंबई उच्च न्यायालयानं केला.

तसंच ठाणे महापालिकेला यासंदर्भात तीन दिवसांत सविस्तर प्रतिज्ञापत्र आणि राज्य सरकारलाही याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश हायकोर्टाकडून देण्यात आलेत.

## SPORTS

# Vedika Sharma Defied Deafness To Prove "Anything Is Possible" Winning Paralympics Bronze In Brazil

**Bikaner :** "Who says there cannot be a hole in the sky, hurl a stone at your health" - the popular expression means anything is possible if you try hard enough.

Pradeep Sharma and his daughter Devika proved that in real life.

Pradeep Sharma, father of Vedika Sharma, was faced with the harsh truth that his daughter was deaf and mute when the daughter was just nine months old. But Pradeep never let it dominate him.

Vedika, too, did not succumb to her deficiency and made possible what was impossible in the eyes of society.

Pradeep Sharma initially tried to enrol Vedika in an English medium school when she attained the age, but there she was refused. After this, the father enrolled Vedika in a Hindi medium school. Now Vedika has graduated from general education, and she is doing her post-graduation.





Father Pradeep Sharma says that when Vedika grew up, she thought that she should do something that would be useful in her life and make her stand apart from others. In the beginning, she thought she would learn archery, but at that time, there was no coaching for girls.

Devika started pistol shooting training. Devika's motivation was further boosted when, in the very first year, she won the gold medal in 10 meters in the state championship. After this, she continued to perform better in the state and national open championships and won medals. In the 2022 Deaf Olympics in Brazil, she was selected. Vedika won the bronze medal.

Pradeep says that he constantly encourages his daughter and gives time to her time. Be it the shooting range in Jaipur, Delhi or wherever she has to be taken, he goes with her. For the father, now the focus was on his daughter. The goal is that Vedika will shine in the Olympics and World Championships and bring gold medals.

The Rajasthan government gave Vedika a prize money of one crore rupees for winning the bronze medal in the Deaf Olympics. Not only that, after winning this medal, Vedika came into the limelight.

When Prime Minister Narendra Modi met the players who participated in the Olympics in Delhi, Vedika was also introduced. Chief Minister Bhajanlal Sharma, Law Minister Arjun Meghwal, Union Minister Anurag Thakur, Union Minister Kiran Rijiju, former Chief Minister Vasundhara Raje, former Chief Minister Ashok Gehlot, Sports Minister Rajyavardhan Singh Rathore and other people encouraged Vedika from time to time.

Vedika's coach, Virender Singh, says she is a talented girl and her best is yet to come. Remembering Vedika's training days, she says that it was definitely a learning experience for her. In training, both of them had to talk in sign language and with gestures. It was a challenge, but Vedika always tried to give her best with full dedication and passion. This is the reason why she achieved such success.

Vedika's coach, Virender Singh, says that the game and the participants are now seeing a period of change. A lot of work is being done at the government level.

There are three categories in the Olympics - the Olympic, Paralympic and Deaf Olympics. There is no sports policy regarding the Deaf Olympics in Rajasthan, so it needs some improvement so that the players of this category can progress.

Secondly, if a player comes with a medal, he or she would have got a job by now, but Vedika has not got a government job yet. Vedika practices regularly for about 8 hours every day. She has set her eyes on the gold medal in the Olympics and World Championships, it is evident.

# 'You Saved Our Eyes': Matthew Hayden's Daughter Celebrates Joe Root's Maiden Century In Australia With Hilarious Remark

**Hyderabad :** Matthew Hayden's daughter, Grace Hayden, came up with a hilarious comment after Joe Root's Maiden Test century in Australia. She wrote on her social media handle, 'you saved our eyes' on Thursday. The comment was made in the context of Matthew Hayden's remark, where he had claimed that he would run naked at the Melbourne Cricket Ground if Root fails to score a hundred in the Ashes.




Australia are currently up against England in the second Test of the Ashes 2025/26. On Day 1, the Australian bowlers, led by Mitchell Starc, dominated the proceedings for most of the day. However, Joe Root and Zak Crawley saved the day for the visitors as they stitched a 117-run partnership for the third wicket.

Root was unbeaten by the end of Day 1 after scoring 135 runs from 202 deliveries, laced with 15 boundaries and a six. After Root completed his century, Grace came up with a cheeky one-line saying that Root saved everyone from watching a naked Matthew Hayden running around at the MCG.

"Root, thank you, you've saved all our eyes," she posted on Instagram stories.

**Hayden congratulates Root**

In a video uploaded by 7Sports Australia, the former Australian opener congratulated Root, saying no one had more stakes to lose than him.

Matthew Hayden daughter shares hilarious story after Joe Root's century

Grace Hayden Instagram Story (Screen Grab from Grace Hayden Insta Handle)

"Congratulations, mate, on a hundred here in Australia. Took you a while, and there was no one that had more skin in the game than me, literally. I was backing you for a hundred in a good way. So congratulations, ten fifties and finally a hundred. You little ripper mate. Have a beauty and bloody enjoy it," Hayden said.

**Root crosses 1000-run milestone in Australia**

The ace England batter also crossed the 1000-run mark in Test cricket on Australian soil. The right-handed batter has racked up 1006 runs in Australia, laced with a century and nine fifties in 30 innings.

Also, it was the 22nd World Test Championship Century (WTC), and he has scored the most centuries in the cycle. With the sensational ton, he extended his lead over Steve Smith, who is placed second with 13 centuries to his name.

# Hans Niemann Outplayed Fabiano Caruana To Win Unique Diving Chess Championship

**Hyderabad :** American Grandmaster Hans Niemann emerged triumphant in the Diving Chess Championship, a unique event which featured underwater chess. The event occurred in Cape Town, South Africa, as a build-up to the 2025 Freestyle Chess Grand Slam Finals.

Vidit Gujarathi of India needed to be in the fourth spot in the competition. He suffered a defeat in the match against the recently crowned World Cup winner, Javokhir Sindarov, who earned a third-place finish.

**How Diving Chess Championship work?**

The event was played in the rooftop pool of the Silo Hotel in Cape Town. The games were played in freestyle format. A chessboard was placed 110 centimetres deep at the bottom of the pool in a unique occurrence. The players have to dive in and go underwater to make their moves. After playing their moves, the respective player comes back to the surface to catch their breath. After one player comes above the surface after playing his move, the opponent must immediately go underneath to play their own move.

Hans beat Caruana to win the title and later faced the Diving Chess World Champion, Michal Mazurkiewicz. His



opponent started the game on high and won a rook and pawn for a bishop early in the game due ot a blunder committed by Hans on the second move in the game.

However, Hans paved his way back into the game to secure a victory.

**2025 Freestyle Chess Grand Slam Finals**

The underwater chess championship was one of the events which are played in the lead-up to the 2025 Freestyle Chess Grand Slam Finals. The final tournament of the tour will be held from December 8–11 in Cape Town. The event is also expected to draw limelight as Norwegian Grandmaster Magnus Carlsen will headline the event.

Carlsen, along with Levon Aronian and Vincent Keymer, met local chess players at the University of the Western Cape. Carlsen and Aronian made up for a pair while the other duo was of Keymer and his coach, Peter Leko, to play in two simultaneous exhibitions over 40 boards.

# ऊर्जा क्षेत्रात 'एआय' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पर्यावरणपूरक शाश्वत विकासाची सुरूवात – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## महावितरणमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (एआय) आधारित डिजिटायझेशन

● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यात सौर ऊर्जेसह नविनीकृत ऊर्जा स्त्रोतांच्या 'डिजिटल ट्वीन' पद्धतीच्या माध्यमातून वीज वितरण व्यवस्था मजबूत करण्यात येणार आहे. महावितरणमध्ये आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहभागातून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (एआय )आधारित डिजिटायझेशन उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे 'एआय' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्रात पर्यावरणपूरक शाश्वत आर्थिक विकासाची सुरूवात होत असल्याचा विश्वास प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.




महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) 'द रॉकफेलर फाउंडेशन-आरएफ', 'ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट-जीईएपीपी' आणि ऊर्जा विभाग यांच्या सहकार्यातून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (एआय) आधारित डिजिटायझेशन उपक्रम राबविणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमेरिकेतील रॉकफेलर फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. राजीव शाह यांची यावर्षी जानेवारीमध्ये यासंदर्भात चर्चा झाली. यामध्ये वीज वितरण प्रणालीमध्ये डिजिटल ट्वीन वापर करण्याची अतिशय नाविन्यपूर्ण संकल्पना पुढे आली. ऊर्जा विभागही मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे असून त्यांनी महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्राच्या दृष्टीने हा क्रांतिकारी निर्णय घेतला.

"आरएफ आणि जीईएपीपीसारख्या संस्थांच्या सहकार्यातून अत्याधुनिक एआय आधारित जागतिक दर्जाचा प्लॅटफॉर्म हा देशातील इतर वीज कंपन्यांसाठी आदर्श ठरेल, वीज वितरण क्षेत्रातील कंपन्यासाठी हा एक आदर्श मानदंड असेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

रॉकफेलरचे अध्यक्ष डॉ. शाह यांच्या प्रतिसादाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे. ग्राहक सेवा उन्नत करण्याकरिता आणि कालांतराने महावितरणला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरिता एआय-आधारित निर्णय-सहाय्यक साधने अत्यंत उपयुक्त आहेत. महावितरण कंपनीसाठी विकसित होणाऱ्या उपाययोजना वीज वितरण क्षेत्रातील दीर्घकालीन, शाश्वत आणि परिणामकारक सहाय्यभूत असतील, असा दृढ विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

वीज वितरणमध्ये 'डिजिटल ट्वीन' पद्धती विकसित करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. नाविन्यपूर्ण एआय -आधारित उपक्रमातून शाश्वत पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर वाढण्यासाठी ग्रामीण भागात मोठे बदल होतील.

**डिजिटायझेशन उपक्रम : महाराष्ट्रातील वाटचाल**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागांतील शेतकरी आणि वीज ग्राहक यांना या नवीन डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक विश्वसनीय व विजेची सहज उपलब्धता मिळणार आहे. जागतिक स्तरावरील एआय तंत्रज्ञान व ऊर्जा क्षेत्रातील थेट भागीदारीच्या मदतीने, महाराष्ट्रात प्रगत डिजिटल प्रणाली लागू होइल. ज्यामुळे वीज प्रवाहाची अचूकता, क्षेत्रीय कामकाज, आणि ऊर्जा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होणार आहे.

या उपक्रमामध्ये, वीज नेटवर्कचे डिजिटल मॉडेल तयार केले जात आहे जेणेकरून वीज प्रवाहाचे विश्लेषण, ग्रीडची ऑप्टिमायझेशन, वीज आउटेज नियोजन, नवीनीकृत ऊर्जा स्त्रोतांचे (आरई) अधिक चांगले समायोजन होईल. विद्युत वाहिन्यांच्या देखभालीसाठी अधिक जागरूक नियोजन तसेच शेतकऱ्यांसाठी सौर उर्जा वापर यासाठी ही कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली काम करेल.

ही डिजिटल प्रणाली महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (एमएसईडीसीएल) मध्ये लागू केली जात आहे, ज्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या तांत्रिक किचकट अडचणी दूर होण्याची ही सुरवात आहे.

**हरित ऊर्जा प्रणालीकडे स्वयंपूर्ण कार्यक्षम वाटचाल संधी**

ऊर्जा क्षेत्रावर हे बदल मोठे परिणाम करणार आहे, असे ऊर्जा विभागाने म्हटले आहे. या डिजिटल रूपांतरणामुळे प्रकल्प व्यवस्थापनात जलद निर्णय घेता येतात. यामुळे ग्रीडच्या कार्यक्षमतेत वाढ झाली असून, सौर ऊर्जा अधिक प्रमाणात उपयोगात आली आहे. या हरित ऊर्जा वापराने प्रदूषणात मोठी घट होणार आहे. या नव्या प्रणालीमुळे विद्युत वितरणामध्ये कमीत कमी एक टक्का जरी वीज गळती घटली तरी वर्षाला सुमारे १०००-१५०० कोटी रुपयांची बचत होऊन नुकसानीत मोठी घट होणार आहे.

**राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व**

उपक्रमात जागतिक सहभागामुळे याप्रकारच्या डिजिटल उपाययोजना, विशेषतः भारतासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या देशांत, वीजविषयक स्थिरता, अखंड उपलब्धता व ग्रामीण भागांत विद्युत सेवांची गुणवत्ता सुधारण्यात महत्त्वाचा बदल ठरू शकतो. भारतात वीज वितरण व्यवस्थेत एआय डिजिटल प्रणाली वापराचा महत्त्वपूर्ण प्रयत्न होत असून, आधुनिक भारताला शाश्वत स्वयंपूर्ण, पर्यावरणपूरक कार्यक्षम ऊर्जा प्रणालीची गरज आहे. या उपक्रमामुळे यात योगदान देण्याची संधी महाराष्ट्राला प्राप्त झाली आहे.

**ऊर्जा क्षेत्रात नवे युग**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व डिजिटायझेशनच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) ऊर्जा क्षेत्राचे आधुनिकीकरण करणार आहे. महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्रात नवे युग सुरू होणार आहे.

**उपक्रमाचे मुख्य उद्दिष्टे**

– वीज प्रवाह, ग्रीड ऑप्टिमायझेशन, आणि नूतनीकरणीय ऊर्जेचे एकत्रीकरण अधिक प्रभावी होणार.

– ग्राहक सेवा आणि वितरण कार्यक्षमता सुधारून आर्थिक सक्षमता साध्य घेणार.

– महाराष्ट्रातील संपूर्ण वीज वितरण विद्युत वाहिन्यांच्या देखभाल व नियोजनात सुधारणा घेणार.

**ग्रामीण ग्राहक व शेतकऱ्यांना लाभ**

या नवीन डिजिटल प्रणालीमुळे सौर ऊर्जेचा वापर वाढवता येईल, शेतकऱ्यांना व ग्रामीण भागातील ग्राहकांना अधिक विश्वसनीय आणि अखंड वीजपुरवठा मिळेल.

# पिंपरी-चिंचवड निवडणुकीसाठी डिसेंबरमध्ये आचारसंहिता लागेल; मंत्री चंद्रकांत पाटील यांचा दावा

● पुणे, शकील शेख :




आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी २० किंवा २२ डिसेंबरला आचारसंहिता लागू होईल, असा दावा भाजप नेते व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केला.

त्यांनी सांगितले की, इतर पक्षातील शहरातील जे माजी नगरसेवक भाजपमध्ये प्रवेश करू इच्छित आहेत, त्यांच्या नावावर प्रथम स्थानिक गाभा समिती (कोअर कमिटी) एकमत करतील. समितीने एकमत केलेली नावे पुढे प्रदेशकडे पाठवली जातील. नावे निश्चित करण्याचे काम सुरू आहे, असेही मंत्री पाटील यांनी स्पष्ट केले.

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंत्री पाटील यांनी गुरूवारी पिंपळेसौदागर येथे पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीस शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, महापालिका निवडणूक प्रमुख आमदार शंकर जगताप, प्रदेश सचिव राजेश पांडे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप, शहर सरचिटणीस विकास डोळस, युवक अध्यक्ष दिनेश यादव आदी उपस्थित होते. बैठकीत अर्ज व उमेदवारी निश्चितीबाबत चर्चा झाली.

मंत्री पाटील म्हणाले, "२० किंवा २२ डिसेंबरला महापालिका निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होईल. आजपासून इच्छुक उमेदवारांना अर्ज दिले जातील. पुढील चार दिवस अर्ज भरले जातील. अर्ज देण्यासाठी कोणतेही शक्तीप्रदर्शन करायचे नाही; स्वतः इच्छुकाने पक्ष कार्यालयात येऊन अर्ज द्यावा. अर्जांची छाननी केली जाईल आणि ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे पाठवली जाईल.

**उमेदवारांची निवड खासगी संस्थेद्वारे**

उमेदवारांची निवड एका खासगी संस्थेद्वारे करण्यात येणाऱ्या सर्व्हेच्या आधारे केली जाईल. अर्जानुसार प्रत्येकाचा सर्व्हे केला जाईल. सर्व्हेचा निकाल उमेदवारी ठरवण्यासाठी आधार म्हणून घेतला जाईल, पूर्णपणे त्यावर निर्णय होणार नाही. स्थानिक पदाधिकाऱ्यांचे मतदेखील घेतले जाईल. सर्व्हे व पदाधिकाऱ्यांचे मत ९० ठिकाणी जुळले, तर प्रदेश नेतृत्व हस्तक्षेप करणार नाही. अंतिम मान्यता प्रदेशकडून दिली जाईल आणि उमेदवार निश्चित होताच जाहीर केले जातील.

# नोटरींसाठी दिलासादायक निर्णय

## राज्यातील सर्व उपकोषागारांत नोटरी मुद्रांक तिकिटे उपलब्ध

● नवी मुंबई, भावना जैन :





महाराष्ट्रातील नोटरींसाठी महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला असून, आता नोटरी मुद्रांक तिकिटे राज्यातील प्रत्येक उपकोषागारात उपलब्ध होणार आहेत. लेखा व कोषागारे संचालनालयाच्या कोकण विभागाकडून बुधवारी यासंदर्भातील आदेश जारी करण्यात आले.

या निर्णयामुळे आतापर्यंत केवळ मुंबईतील मुख्य मुद्रांक पुरवठा कार्यालयातून तिकिटे घेण्यासाठी करावी लागणारी पळापळ अखेर संपणार आहे. ग्रामीण भागातील आणि उपनगरातील नोटरींना या तिकिटांसाठी प्रवास व वेळेचा मोठा खर्च सहन करावा लागत होता.महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर हा निर्णय संभवला आहे. संघटनेचे राज्याध्यक्ष सय्यद सिकंदर अली यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. नागेश हिरवे आणि सहकाऱ्यांनी संबंधित विभागाशी सतत पाठपुरावा केला होता. याबाबत माहिती देताना असोसिएशनचे प्रवक्ते आणि कोकण विभागाध्यक्ष ॲड. समीत राऊत म्हणाले, नोटरी स्टॅम्प मिळवण्यासाठी अनेकांना मुंबईपर्यंत जावे लागत होते. उपकोषागारांमधून ही सुविधा सुरू झाल्याने हजारो नोटरींचा वेळ व खर्च वाचणार आहे.

# दिघी पोर्टवरुन दरवर्षी दोन लाख वाहनांची निर्यात होणार; रायगड बनणार ऑटोमोबाईल निर्यात केंद्र

● रायगड, फरीद डावरे :

रायगड जिल्ह्यातील दिघी पोर्ट दरवर्षी दोन लाख वाहने हाताळण्याकरिता सज्ज झाले आहे. त्याकरिता मदरसनने आपल्या संयुक्त उपक्रम कंपनी 'समवर्धन मदरसन हामाक्युरेक्स इंजिनिअर्ड लॉजिस्टिक्स लिमिटेड' (एसएएमआरएक्स) मार्फत आज दिघी पोर्ट लिमिटेड (डीपीएल) सोबत भागीदारी करार केला आहे. डीपीएल ही अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड (एपीएसईझेड) ची उपकंपनी आहे. या करारानुसार महाराष्ट्रातील दिघी पोर्टवर वाहन निर्यातीसाठी एक विशेष सुविधा उभारली जाणार आहे.




**दिघी पोर्ट बनणार ऑटोमोबाईल निर्यात केंद्र**

या धोरणात्मक भागीदारीमुळे मुंबई–पुणे ऑटो बेल्टमधील वाहन उत्पादकांसाठी दिघी पोर्ट हे महत्त्वाचे ऑटोमोबाईल निर्यात केंद्र बनेल. एपीएसईझेडच्या १५ महत्त्वाच्या बंदरांपैकी एक असलेले दिघी पोर्टने आता 'मेक इन इंडिया' उपक्रमाखाली भारताच्या वाढत्या ऑटोमोबाईल उद्योगाला पाठबळ देण्यासाठी आपली क्षमता वाढवली आहे. ज्यामुळे जागतिक बाजारात वाहनांची निर्यात आणि आयात अधिक सुरळीत होवू शकणार आहे.

**ऑटोमोबाईल लॉजिस्टिक्समध्ये मोठा बदल घडवून येईल**

या भागीदारीबद्दल बोलताना अदानी पोर्ट्स आणि सेझचे सीईओ आणि पूर्णवेळ संचालक श्री. अश्वनी गुप्ता म्हणाले," दिघी पोर्टवरील मदरसनसोबतची ही भागीदारी भारतातील ऑटोमोबाईल लॉजिस्टिक्समध्ये मोठा बदल घडवून आणेल. एपीएसईझेडचे मजबूत पायाभूत नेटवर्क आणि मदरसनचे अनुभव एकत्र येऊन देशभरात वाहन वाहतुकीसाठी एक सुरळीत आणि मजबूत व्यवस्था तयार होईल. हे रोरो टर्मिनल केवळ व्यापार वाढवणार नाही, तर पुरवठा साखळी अधिक कार्यक्षम करेल आणि ग्राहक व स्थानिक समुदायांना दीर्घकालीन फायदा देईल, असा विश्वास या भागीदारीबद्दल बोलताना अदानी पोर्ट्स आणि सेझचे सीईओ आणि पूर्णवेळ संचालक अश्वनी गुप्ता यांनी व्यक्त केला आहे

**भारताची ऑटोमोबाईल पुरवठा साखळी आणखी मजबूत होणार**

एपीएसईझेड सोबतची ही भागीदारी आमच्या जागतिक दर्जाच्या लॉजिस्टिक सेवांचा विस्तार करण्यासाठी खूप महत्त्वाची आहे. दिघी पोर्टवर हे रोरो टर्मिनल विकसित करून आम्ही आमच्या सेवांचा विस्तार करत आहोत आणि आमच्या ओईएम भागीदारांसाठी कार्यक्षमता वाढवणारा आणि खर्च कमी करणारा एक महत्त्वाचा सुविधा प्रकल्प उभारत आहोत.

# मुंबई–गोवा महामार्गाच्या कामाला आता एप्रिल २०२६ चा मुहूर्त; गडकरी यांची लोकसभेत घोषणा

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

मुंबईतील चाकरमान्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेला आणि अनेक वर्षांपासून रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्गाचे काम एप्रिल २०२६ पूर्वी पूर्ण होईल, अशी घोषणा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी लोकसभेत केली.

गेल्या १० वर्षांपासून जास्त काळ काम सुरू असणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गाबाबत नितीन गडकरी यांनी मोठी घोषणा केली. बहुप्रतीक्षित मुंबई-गोवा महामार्ग कधी सुरू होणार याची सगळेच कोकणवासीय, तसेच मुंबईकरही मोठ्या आतुरतेने वाट पाहात असतानाच आता गडकरी यांनी महामार्ग कधी सुरू होणार याची नवी डेडलाइन दिली.

**८९ टक्के काम पूर्ण**

मुंबई-गोवा महामार्गाचे ८९ टक्के काम पूर्ण झाले आहे. यावर्षी एप्रिलपर्यंत संपूर्ण रस्ता तयार होईल आणि नागरिकांचा त्रासही संपेल, असे गडकरींनी म्हटले आहे. तसेच, या महामार्गाला खूप विलंब झाला याचा मी स्वीकार करतो, असेही त्यांनी म्हटले आहे.

**१० वर्षांपासून काम सुरू**

मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेल्या १० वर्षांपासून सुरू आहेच. चंद्रावर जाण्यासाठी जितका खर्च झाला नाही त्यापेक्षा जास्त खर्च या महामार्गासाठी झाला आहे. तरीही आजपर्यंत हा रस्ता पूर्ण झालेला नाही. त्यामुळे रस्त्याच्या या कामात तुम्ही वैयक्तिकरीत्या लक्ष घातले तरच काम होईल.

**कंत्राटदार बदलले**

अरविंद सावंत यांच्या प्रश्नावर उत्तर देताना गडकरींनी म्हटले आहे की, या रस्त्याचे काम २००९मध्ये सुरू झाले आणि मी २०१४ मध्ये मंत्री झालो. त्यामुळे जुन्या सरकारने सार्वजनिक बांधकाम विभागाला याचे काम दिले होते. येथे भूसंपादनाच्या समस्या होत्या. आत्तापर्यंत खूप कंत्राटदार बदलले त्याचे काय कारण हे कळू शकले नाही. अनेकदा कारवाईही करण्यात आली, असे गडकरी म्हणाले.

# 'आसाम कॅन्सर केअर मॉडेलच्या' धर्तीवर राज्यात उपचार; टाटा रुग्णालय प्रमुख संस्था म्हणून काम पाहणार; १०० कोटींचा निधी उपलब्ध करून देणार

● मुंबई, राकेश गायकवाड :

कर्करोगाचे वाढते प्रमाण व कर्करोग उपचाराचे गांभीर्य विचारात घेता राज्यातील जनतेस सर्वसमावेशक कर्करोग सेवा राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने दिलेल्या सूचनेनुसार 'आसाम कॅन्सर केअर मॉडेलच्या'




धर्तीवर राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा एल १,एल २, एल ३ उपलब्ध होणार आहेत. एल १ या स्तरामध्ये टाटा स्मारक रुग्णालय कर्करोगासाठी प्रमुख संस्था म्हणून काम करणार आहे. यासाठी १०० कोटींचा निधी विविध माध्यमातून उपलब्ध करण्यात येणार आहे.राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा उपलब्ध होणार आहेत. एल १ मध्ये टाटा स्मारक रुग्णालय ही कर्करोगाकरिता शिखर संस्था म्हणून काम करणार आहे.एल २ या स्तरावरती कायमस्वरूपी संपूर्ण कर्करोग शिक्षण व सेवा असेल यामध्ये छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, मुंबई (जे.जे.), कोल्हापूर, पुणे (बैरामजी जिजीभॉय शासकीय महाविद्यालय), नांदेड येथील ७ शासकीय महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालये, नाशिक व अमरावती येथील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील दोन संदर्भ सेवा रूग्णालयांचा यामध्ये समावेश आहे. अशी नऊ केंद्रे एल २ मध्ये समाविष्ट आहेत. एल ३ यास्तरामध्ये मध्ये कर्करोग निदान आणि डे-केअर रेडिओथेरपी व किमोथेरपी युनिटस यामध्ये कार्यरत असणार आहेत. एल ३ स्तरावरील कर्करोग रुग्णालयांचे बांधकाम शासनामार्फत होऊन ही रुग्णालये सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर उभारण्यात येतील.

**१०० कोटींचा निधी**

महाकेअर फाऊंडेशनला दैनंदिन भागभांडवल म्हणून सुरुवातीला १०० कोटी रुपये इतका निधी 'कॉर्पस फंड' म्हणून राज्य शासनामार्फत महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत दुर्धर आजारासाठी उभारण्यात येणाऱ्या २० टक्के राखीव निधीतून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महाकेअर फाऊंडेशन**

एल २ व एल ३ स्तरावरील आरोग्य संस्थांना आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, संस्थांचे व्यवस्थापन करणे, पीपीपी धोरण राबवणे तसेच इतर अनुषंगिक बाबी पार पाडणे इ. बाबींसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कंपनी कायदा, २०१३ मधील सेक्शन-८ अंतर्गत महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन" महाकेअर फाऊंडेशन ही कंपनी स्थापन करण्यात येणार आहे.